दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३३८ I सोमवार २१ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

साईवेद प्रकाशन
विचारांचा प्रकाश, परिवर्तनाची दिशा

URGENTLY REQUIRED
RECEPTIONIST / TELECALLER - 01
Apply on mail:
saived.print@gmail.com
INTERVIEW DATE: 28 SEPTEMBER 2026
SAIVED PRAKASHAN PRIVATE LIMITED
Office: Daily Rashtra Sahyadri Office,
Opposite Mac Care Hospital, Zopdi Canteen, Ahilyanagar.
Mo: 7588605255

# दुष्काळ जाहीर करा; विकासकामे थांबवा!

## शक्तीपीठ महामार्गाचा निधी शेतकऱ्यांकडे वळवा : रोहित पवारांची मागणी

### 'खरीप ७५ टक्क्यांहून अधिक उद्ध्वस्त; पुढील दहा महिने शेतकऱ्यांना जगवण्याचे आव्हान'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**धाराशिव :** राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घकाळ ओढ दिल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर असलेले राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारकडे तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत देण्याची मागणी केली आहे.

त्याचबरोबर शक्तीपीठ महामार्गासारखी विकासकामे तूर्तास थांबवून त्यासाठीचा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वळवावा, अशी मागणी त्यांनी केली. रोहित पवार यांच्या दौऱ्याची सुरुवात धाराशिवमधून झाली असून ते बीड व लातूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. (पान ४ वर)



लातूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांनाही २ लाख रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याच्या मागणीसाठी खंडाळी (ता. अहमदपूर, जि. लातूर) इथं वि.का.से.सोसायटीचे चेअरमन व्यंकट पाटील हे गेल्या तीन दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाला आ. पवार यांनी भेट देऊन उपस्थितांशी संवाद साधला आणि त्यांना पाठिंबा दिला.

### हिरव्या चाऱ्याचे भाव भिडले गगनाला

दुष्काळाची भीषण दाहकता भेडसावू लागली असून जनावरांच्या चाऱ्याचे भाव गगनाला भिडल्याने बळीराजा अडचणीत आला आहे. एका बाजूला पावसामुळे शेतातील पिके करपून गेली असताना दुग्ध व्यवसाय हाच शेतकऱ्याचा जगण्याचे साधन असताना आता पाऊसच नसल्याने चाऱ्याचे भाव गगनाला भिडल्याचे चित्र दिसत आहे. ज्या ठिकाणी थोडेफार पाणी आहे, अशा ठिकाणी शेतकऱ्यांकडून मक्याचे पीक घेण्यात येत असून हे मकवान आता सहा हजार रुपये टन अशा दराने विकले जाऊ लागले आहे. सध्याच्या परिस्थितीत हाही चारा थोडासा असल्याने याचे भाव अजूनही वाढत जाणार आहेत. सध्या सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरमधून सांगोला, मंगळवेढा, माढा, करमाळा अशा ठिकाणी हा चारा चढ्या भावाने विकला जात असून आता जनावरे सांभाळणे मुश्किल बनल्याची खंत पशुपालकांकडून व्यक्त होत आहे.

# ...खिशात बॉम्ब टाकून मंत्र्याला मिठी मारू

## दुष्काळाच्या झळा तीव्र : यवतमाळात तरुण शेतकऱ्याच्या संतापाचा उद्रेक!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/यवतमाळ :** राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घकाळ ओढ दिल्याने खरीप पिकांवर संकट ओढवले असून दुष्काळसदृश परिस्थिती गंभीर होत आहे. सरकारकडून जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मंत्र्यांना सूचना देण्यात आल्या असल्या, तरी अद्याप अधिकृत दुष्काळ जाहीर झालेला नाही. दरम्यान, मदतीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांमध्ये संताप वाढत असून यवतमाळ जिल्ह्यात एका तरुण शेतकऱ्याने संतापाच्या भरात सरकार आणि मंत्र्यांविषयी हिंसक धमकीची भाषा केल्याने खळबळ उडाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेतला. पावसाच्या खंडामुळे उभ्या पिकांचे नुकसान झाल्याचे सांगत त्यांनी पालकमंत्र्यांना आपापल्या जिल्ह्यांतील पिकांची स्थिती, उत्पादन आणि पाणीटंचाईचा प्राथमिक आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. येत्या आठवड्यात प्राथमिक पाहणी पूर्ण करून त्यानंतर पंचनाम्याची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

कर्जमाफीची प्रक्रियाही सुरू असून काही लाभार्थी याद्या जाहीर झाल्याचे आणि उर्वरित याद्या लवकर पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.दरम्यान, यवतमाळ जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत. उभी पिके संकटात (पान ४ वर)

#### ५ ऑक्टोबरनंतर पंचनामे; त्याआधीही मदतीचे आश्वासन



एनडीआरएफच्या निकषांनुसार आवश्यक पंचनामे ५ ऑक्टोबरनंतर करण्यात येणार आहेत. मात्र, केंद्राच्या मदतीची प्रतीक्षा न करता राज्य सरकार स्वतः च्या निधीतून शेतकऱ्यांना तातडीची मदत देणार आहे. पिण्याचे पाणी, चारा आणि सिंचनासाठी अतिरिक्त वीज उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनाही तातडीने राबवण्यात येतील.
– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

# डिंभे-माणिकडोह बोगद्याआधी श्रीगोंद्याच्या राजकारणातील भगदाड जनतेसमोर !

## 'आम्हाला भेटूही देत नाही, बोलूही देत नाही'

### राम शिंदेंसमोरच दरेकरांचा सवाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** डिंभे-माणिकडोह बोगद्याच्या चर्चेआधीच श्रीगोंद्याच्या राजकारणातील अंतर्गत धुसफूस चव्हाट्यावर आली. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास पीडब्ल्यूडी विश्रामगृहात आले असता तालुक्यातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीतच बैठकीत तणाव निर्माण झाला.

बाबासाहेब भोस व घनश्याम शेलार हे प्रा. राम शिंदे यांच्यासोबत स्वतंत्र चर्चेसाठी एका खोलीत गेल्यानंतर सुभाष शिंदे व प्रशांत दरेकर यांना आत प्रवेश न मिळाल्याचे सांगण्यात आले. त्यावर (पान ४ वर)



#### उद्याच्या भविष्यासाठी पाणी महत्त्वाचे – प्रशांत दरेकर

जेष्ठ नेत्यांनी आमच्यासह तरुणांच्या डोक्यावर हात ठेवून कामे करून घेतली पाहिजेत त्यांना स्फूर्ती दिली पाहिजे त्यासाठी अडवणूक करणे चुकीचे आहे त्यात उद्याच्या भविष्यासाठी पाणी प्रश्न महत्त्वाचा आहे त्यासाठी हेवे दावे विसरून एकत्र काम करणे गरजेचे आहे असेही प्रशांत दरेकर यांनी बोलताना सांगितले आहे

# आकारी पडित लाभार्थ्यांकडून गिरीधर आसने यांचा सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव :** शेती महामंडळाच्या हरिगांव मळा नऊ गांवे अकारी पडीत चळवळीचे मुळ याचिकाकर्ते व विखे पाटील परिवारांचे तिसऱ्या पिढीतील समर्थक गिरीधर आसने यांच्या समर्थक अकारी पडीत लाभधारक माळवाडगांव येथील लाभधारक अकारी पडीत शेतकऱ्यांचे वतीने श्रीरामपूर तालुका भाजपा कार्यकारिणीचे वतीने आज लोणी येथील जनसेवा संपर्क कार्यालयात शेतकरी संघटनेचे सत्कारा व्यतिरिक्त स्वतंत्र सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात सत्कार मोठ्या आनंदात दिलखुलासपणे सत्काराचा स्विकार केल्यानंतर ना.विखे पाटील यांनी स्वतः हून भाजपा पदाधिकारी लाभधारक अकारी पडीत शेतकरी यांच्यात बसुन भारतीय बैठक मांडली.या मंत्रिमहोदयांचे आपल्यातील बैठकीने तमाम लाभधारक अकारी पडीत शेतकरी व भाजपा (पान ४ वर)



आमने सामने

# अकारी पडीत जमिनींचे वाटप खंडकरी धर्तीवरच

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही; शेतकऱ्यांकडून सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** शेती महामंडळाच्या हरिगाव मळा हद्दीतील नऊ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांच्या जमिनींच्या वाटपाची प्रक्रिया यापूर्वी झालेल्या खंडकरी जमिनींच्या वाटपाच्या धर्तीवरच राबविण्यात येणार असल्याची ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

लोणी येथील जनसेवा संपर्क कार्यालयात अकारी पडीत शेतकऱ्यांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अकारी पडीत शेतकऱ्यांचा प्रश्न (पान ४ वर)



# अंगणवाडी सेविकांना पर्यवेक्षिका होण्यासाठी वयोमर्यादेचा अडसर दूर!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** अंगणवाडी सेविकांना पर्यवेक्षिका पदावर पदोन्नती मिळण्यातील वयोमर्यादेचा अडसर अखेर दूर झाला आहे. पर्यवेक्षिका पदासाठी कमाल वयोमर्यादा ५० वर्षे करणारा राज्य शासनाचा ३ जुलै २०२६ रोजीचा शासन निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने रद्द केला असून, ५५ वर्षांपर्यंतच्या पात्र अंगणवाडी सेविकांना पदोन्नतीसाठी विचारात घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाने संबंधित पदासाठी ५५ वर्षे कमाल वयोमर्यादा ठेवून नव्याने जाहिरात काढण्याचे निर्देशही शासनाला दिले आहेत.

महिला व बालविकास विभागाने ४ जून २०२१ रोजी केलेल्या सेवा प्रवेश नियमांमध्ये पर्यवेक्षिका पदावरील पदोन्नतीसाठी कमाल वयोमर्यादा ५५ वरून ४५ वर्षे करण्यात आली होती. या निर्णयाला अकोला जिल्ह्यातील दहा अंगणवाडी सेविकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान दिले होते. ८ मे २०२६ रोजी न्यायमूर्ती (पान ४ वर)

# दोन लाखांत 'गुन्हा मॅनेज'!

## लाच घेताना पोलीस अंमलदार जाळ्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी शहर : हाफ मर्डर व रॉबरीचा गुन्हा दाखल न करता सौम्य स्वरूपाचा गुन्हा दाखल करून जामीन मिळवून देण्यासह तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात पाच लाख रुपयांची लाच मागणाऱ्या पाथर्डी पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. विनोद शिवाजी मासाळकर असे ताब्यात घेतलेल्या पोलीस अंमलदाराचे नाव आहे. तडजोडीनंतर ठरलेल्या २ लाख १५ हजार रुपयांपैकी एक लाख रुपयांची रक्कम स्वीकारताना एसीबीच्या पथकाने ही कारवाई केली.

तक्रारदार यांच्या हॉटेलवर काम करणाऱ्या नोकराचा एका ट्रकचालकाशी वाहनाला कट लागल्याच्या कारणावरून वाद होऊन मारामारी झाली होती. या प्रकरणात संबंधित नोकरावर गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात(पान ४ वर)

# शेवगावकरांनीही जपली गौतमी पाटीलच्या कार्यक्रमातील धिंगाण्याची 'परंपरा'!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



- खंडोबा मैदानावर तुफान गर्दी
- हुल्लडबाजी वाढल्याने पोलिसांचा सौम्य लाठीमार

**शेवगाव :** सुप्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिच्या कार्यक्रमात होणारी प्रचंड गर्दी आणि त्यानंतर निर्माण होणारा गोंधळ शेवगावातही पाहायला मिळाला. शहरातील खंडोबानगर येथील खंडोबा मैदानावर आयोजित गौतमी पाटील यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला हजारो रसिकांनी गर्दी केली. मात्र गर्दी वाढल्यानंतर काही तरुणांनी हुल्लडबाजी सुरू केल्याने कार्यक्रमस्थळी काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. अखेर पोलिसांना हस्तक्षेप करून सौम्य लाठीमार करत गर्दीवर नियंत्रण मिळवावे लागले.

गणेशभक्त व रसिक प्रेक्षकांसाठी आयोजित भव्य सांस्कृतिक महोत्सवांतर्गत सायंकाळी सहा वाजता गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम सुरू होताच मैदानावर मोठी गर्दी झाली. विशेषतः तरुणांची संख्या मोठी असल्याने गर्दी नियंत्रित करणे संयोजकांसह पोलिसांसाठी आव्हान ठरले.

गर्दीतील काही तरुणांकडून हुल्लडबाजी सुरू झाल्यानंतर संयोजकांनी वारंवार सूचना करूनही परिस्थितीत फारसा फरक पडला नाही. त्यामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत सौम्य लाठीमार केला. त्यानंतर गर्दी नियंत्रणात आली आणि कार्यक्रम पुन्हा सुरळीत झाला. कोणतीही मोठी अनुचित घटना घडली नसल्याची माहिती आहे.

# प्रवरेच्या लेकीची स्वीडनच्या संसदेत एन्ट्री

## निला विखे-पाटील यांची ऐतिहासिक कामगिरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** अहिल्यानगरच्या मातीशी नाते असलेल्या निला विखे-पाटील यांनी स्वीडनच्या राजकारणात महत्त्वाचे यश मिळविले आहे. १३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या स्वीडनच्या राष्ट्रीय निवडणुकीत ग्रीन पार्टीच्या निला विखे-पाटील यांची 'सिटी ऑफ स्टॉकहोम' मतदारसंघातून ३४९ सदस्यीय रिक्सदाग अर्थात स्वीडनच्या संसदेत निवड झाली. स्वीडिश संसदेच्या अधिकृत नोंदीतही त्यांच्या नावाची पक्ष आणि मतदारसंघासह नोंद आहे.

निला विखे-पाटील या महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञ डॉ. अशोक विखे-पाटील यांच्या कन्या असून, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या पणती आणि माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे-पाटील यांच्या नात आहेत. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या त्या पुतणी आहेत.



त्यांचे बालपण काही काळ अहिल्यानगरमध्ये गेले. भारताशी असलेले नाते आणि आजोबांच्या आठवणींबद्दल त्यांनी अनेकदा सार्वजनिकरित्या भावना व्यक्त केल्या आहेत.

निला यांनी अर्थशास्त्र आणि कायद्याचे शिक्षण घेतले असून एमबीएची पदवीही मिळविली आहे.

#### कुटुंबातील सदस्य स्वीडनच्या संसदेत निवडून जाणे गौरवास्पद : ना. विखे पाटील

निला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत खासदार म्हणून निवड झाल्याबद्दल जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वागत केले. कुटुंबातील एक सदस्य एवढ्या मोठ्या पदावर निवडून जाणे ही गौरवास्पद बाब आहे. या यशाचा आनंद आमच्या कुटुंबासह संपूर्ण लोणी ग्रामस्थांना आहे. स्वीडनच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेत निला यांनी दिलेल्या निरंतर योगदानाचे हे यश आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

स्वीडनचे माजी पंतप्रधान स्टीफन लोफवेन यांच्या कार्यकाळात त्यांनी पंतप्रधान कार्यालयात राजकीय सल्लागार म्हणून काम केले. वित्त, करप्रणाली आणि गृहनिर्माण या विषयांशी संबंधित जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. याशिवाय स्टॉकहोम शहराच्या नगरपरिषदेतही त्यांनी काम केले आहे.

ग्रीन पार्टीशी दीर्घकाळ जोडलेल्या निला यांनी निवडीनंतर शहर आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्याची इच्छा व्यक्त केली. बालकल्याण आणि पर्यावरण हे संसदेत आपल्या कामाचे प्रमुख विषय राहतील, असे त्यांनी सांगितले. भारताशी असलेले आपले भावनिक नातेही त्यांनी व्यक्त केले आहे.

निला यांच्या निवडीमुळे विखे-पाटील कुटुंबाचे महाराष्ट्राशी असलेले नाते आणि त्यांची स्वीडनमधील सार्वजनिक जीवनातील वाटचाल पुन्हा चर्चेत आली आहे. शिक्षण, सहकार आणि सामाजिक कार्याच्या क्षेत्रात दीर्घ परंपरा असलेल्या या कुटुंबातील पुढील पिढीने स्वीडनच्या संसदेपर्यंत मजल मारली आहे.

# दुष्काळाची चाहूल आणि स्थलांतराचे संकट

**विशेष संपादकीय** — करण नवले (संपादक)

पाऊस हा केवळ शेतीचा आधार नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या चक्राला गती देणारा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. पावसाने दडी मारली की त्याचा परिणाम शेताच्या बांधापलीकडे जातो आणि संपूर्ण ग्रामीण जीवनव्यवस्थेला त्याची झळ बसते. यंदाच्या पावसाच्या अनिश्चिततेमुळे महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होत असल्याचे चित्र आहे. पिके संकटात आली की रोजगार कमी होतो, मजुरीची कामे थांबतात आणि हातावर पोट असलेल्या कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहतो. अशा वेळी गाव सोडून रोजगाराच्या शोधात बाहेर जाणे हा अनेक कुटुंबांसाठी पर्याय नसून गरज बनतो.

दुष्काळाची खरी तीव्रता केवळ पर्जन्यमानाच्या आकडेवारीतून मोजता येत नाही. विहिरींची खालावलेली पातळी, आटणारे जलस्रोत, पिकांची झालेली हानी, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, रोजगाराची कमतरता आणि वाढते कर्ज यांचा एकत्रित परिणाम म्हणजे दुष्काळ. त्यामुळे प्रशासनाने दुष्काळ जाहीर करण्याच्या पारंपरिक निकषांबरोबरच ग्रामीण कुटुंबांच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीचेही मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

विशेषतः भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक शेतकरी आणि असंघटित कामगारांना या परिस्थितीचा मोठा फटका बसतो. गावात काम नाही, घरात उत्पन्न नाही आणि खर्च मात्र सुरूच असतो. बचत संपल्यानंतर कर्जाचा आधार घेतला जातो आणि शेवटी स्थलांतराचा निर्णय घेतला जातो. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक कुटुंबांसाठी हा अनुभव नवा नाही. ऊसतोड, वीटभट्टी, बांधकाम किंवा अन्य हंगामी रोजगारासाठी कुटुंबासह स्थलांतर करावे लागते. मात्र गाव सोडले म्हणजे समस्या संपत नाहीत; त्या केवळ दुसऱ्या स्वरूपात समोर येतात.

स्थलांतरित कामगारांना मजुरीतील अनिश्चितता, ठेकेदारांवरील अवलंबित्व, असुरक्षित कामाचे वातावरण आणि अपुऱ्या निवासाची समस्या सहन करावी लागते. कुटुंबासह स्थलांतर झाल्यास मुलांच्या शिक्षणात खंड पडतो. आरोग्य, पोषण, लसीकरण आणि अन्नसुरक्षेचे प्रश्न निर्माण होतात. महिलांवर घरकाम, मुलांची जबाबदारी आणि मजुरी अशी अनेक पातळ्यांवरची जबाबदारी येते. त्यामुळे स्थलांतराकडे केवळ 'रोजगारासाठी गाव सोडणारे कामगार' म्हणून पाहणे चुकीचे आहे. त्यामागे एक मोठे सामाजिक आणि मानवी संकट दडलेले आहे.

या पार्श्वभूमीवर उपाययोजना केवळ दुष्काळ जाहीर करण्यापुरत्या मर्यादित राहता कामा नयेत. सर्वप्रथम दुष्काळग्रस्त भागात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू केली पाहिजेत. मजुरांना गावातच रोजगार मिळाला, तर स्थलांतराची गरज मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. मजुरी वेळेवर मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे.

पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत टँकर, विहीर अधिग्रहण, जलस्रोतांचे पुनर्भरण आणि आवश्यक ठिकाणी तात्पुरत्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था केली पाहिजे. जनावरांसाठी चारा छावण्या, चारा उपलब्धता आणि पशुधनाच्या आरोग्याची व्यवस्था याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे, पीकविमा भरपाई आणि आवश्यक आर्थिक मदत मिळणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर प्रत्येक दुष्काळप्रवण जिल्ह्याने 'स्थलांतरपूर्व आणि स्थलांतरोत्तर कृती आराखडा' तयार करायला हवा. कोणत्या गावांतून किती कुटुंबे स्थलांतरित होतात, ते कोणत्या जिल्ह्यात किंवा राज्यात जातात, कोणत्या प्रकारचे काम करतात, त्यांच्या मुलांची शाळा आणि आरोग्यसेवा कशी सुरू राहील, याची माहिती प्रशासनाकडे असली पाहिजे. स्थलांतरित कामगारांची नोंदणी आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण यंत्रणात्मक पद्धतीने झाले पाहिजे.

ऊसतोड कामगारांच्या शोषणाविरोधात साखर आयुक्तालयाने घेतलेली कठोर भूमिका याच दिशेने महत्त्वाची पायरी आहे. मात्र इशारे पुरेसे नाहीत; त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे. कामगारांच्या मजुरीपासून त्यांच्या निवास, आरोग्य आणि सुरक्षिततेपर्यंतच्या बाबींची नियमित तपासणी झाली पाहिजे. दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई झाली तरच कायद्याचा धाक निर्माण होईल.

दुष्काळाशी लढताना दीर्घकालीन उपायांकडेही पाहावे लागेल. जलसंधारण, शेततळी, बंधारे, गाळ काढणे, भूजल पुनर्भरण, सूक्ष्म सिंचन आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांना प्राधान्य द्यावे लागेल. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीतही बदल करणे आवश्यक आहे. कमी पाण्यात येणारी पिके, पीक विविधीकरण आणि स्थानिक परिस्थितीला अनुरूप शेती यासाठी शेतकऱ्यांना प्रभावी मार्गदर्शन आणि बाजारपेठेची हमी मिळाली पाहिजे.

दुष्काळ हा केवळ निसर्गाचा प्रकोप नाही; तो प्रशासनाच्या तयारीचीही परीक्षा असतो. पाऊस कमी पडणे आपल्या हातात नसले, तरी त्याचे परिणाम किती तीव्र होतील हे मोठ्या प्रमाणात नियोजनावर अवलंबून असते. गावातील माणसाला गावातच रोजगार, पाणी आणि जगण्याची सुरक्षितता मिळाली तर स्थलांतराची वेळ येणार नाही. त्यामुळे यंदाच्या दुष्काळसदृश परिस्थितीकडे केवळ मदतीची मागणी म्हणून नव्हे, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या भवितव्याचा इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे.

दुष्काळ येण्याची वाट पाहण्यापेक्षा दुष्काळाची चाहूल लागताच प्रशासनाने गावोगावी पोहोचले पाहिजे. कारण तहानलेल्या जमिनीला पाणी आणि बेरोजगार हाताला काम मिळाले, तरच 'स्थलांतर' हा मजबुरीचा मार्ग न राहता ग्रामीण माणसाला आपल्या गावातच सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळेल.

# गणराया बरोबरच गौराईचे वाजत गाजत आगमन



राहुरी शहरातील सुप्रसिद्ध सराफ व्यावसायिक श्री व सौ वैशाली सचिन डहाळे यांच्या घरी गौराईच्या आगमना निमित्ताने सुंदर अशी सजावट करण्यात आली होती. ( छाया राजेंद्र परदेशी )

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यात मोठ्या उत्साहात व ढोल, ताशांच्या गजरात लाडक्या गणरायाचे आगमन झाले. त्यानंतर गुरूवारी 'आली गौराई आली, सोनपावली आली, असे म्हणत माहेरवाशीण गौराईचे आगमन झाले.लाडक्या गणरायाच्या आगमनानंतर महिलांना ओढ लागते ती गौराईचे आगमनाची. गौराईचे आगमन म्हणजे महिलांसाठी एक प्रकारची दिवाळीच होय. राहुरी शहरातील अनेक भाविक भक्तांनी आली गौराई आली, सोनपावली आली, असे म्हणत माहेरवाशीण गौराईचे मोठ्या भक्ती भावाने स्वागत केले. महालक्ष्मींच्या स्वागतासाठी महिलांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. घराची साफसफाई, रंग रंगोटी करुन गौराई समोर करंज्या, शंकरपाळी, अनारसे, रव्याचे व बेसनाचे लाडू, शेव, चकल्या असा फराळ तसेच विविध प्रकारचे फळे ठेवण्यात आली. तसेच विविध प्रकारच्या खेळणी, मंडप व विद्युत रोषणाई केल्याचे दिसून आले. काही घरांमध्ये पारंपरिक पद्धतीने शाडू, पितळी, तर काही ठिकाणी सात खड्यांच्या रूपांत गौराईचे आगमन करण्यात आले. यावेळी मन प्रसन्न करणारे गौराईचे मुखवटे भुरळ घालीत होते. घरासमोर सडा, रांगोळी, हळदी कुंकवाची पावले काढून अगदी उत्साहात ज्येष्ठा व कनिष्ठा गौराईचे आगमन करण्यात आले.पहिल्या दिवशी भाजी व भाकरीचा नैवेद्य दाखविण्यात आला. तर दुसर्या दिवशी महालक्ष्मीला पंच पक्वान्नांचा त्यात सोळा भाज्या, चटणी, आठ कोशिंबिरी, पंचामृत, पुरणपोळी, भजी, पापड, कुरडई अशी नैवेद्याची ताटे भरून महालक्ष्मींना नैवेद्य दाखविण्यात येतो. त्यानंतर महिला हळद कुंकवाचे अदान-प्रदान करून गौराई उत्सवाचा आनंद घेतात. त्यानंतर काल तीसर्या दिवशी खीर, कानवल्यांचा नैवेद्य दाखवून माहेरवाशीण गौराईची सासरी बोळवण करण्यात येणार आहे.

# राहुरीतील भगवा मित्र मंडळाने जपली पर्यावरणपूरक गणेशोत्सवातून संस्कारांची पेरणी





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील श्री भगवा मित्र मंडळाने यंदाचा गणेशोत्सव अधिक अर्थपूर्ण, संस्कारक्षम आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प केला आहे. उत्सवातून भक्ती, भक्तीतून संस्कार आणि संस्कारातून समाजजागृती या भावनेतून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या उपक्रमांची सुरुवात मंडळातील बाल स्वयंसेवकांनी अत्यंत उत्साहाने केली. पर्यावरणाचे संवर्धन आणि प्रदूषणमुक्त उत्सवाचा संदेश देत शाडूच्या मातीची गणेशमूर्ती, कागदापासून तयार केलेले आकर्षक डेकोरेशन तसेच ओला व सुका कचरा यांचे योग्य व्यवस्थापन करण्यात आले.

या काळात पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा संदेश दिला असून पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजमनात रुजावी, या उद्देशाने पर्यावरणपूरक जीवनपद्धती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे व वक्ते यांच्या हस्ते वृक्षारोपण आणि वृक्षवाटप करण्यात आले.सेच श्री बुवासिद्ध देव तालीम संघातील संत रोहिदास महाराज सभागृहाची स्वच्छता करून स्वच्छता, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारीचा सुंदर संगम साधण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन केले नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांनी या कामाला कार्याला शुभेच्छा देत आपण मंडळाच्या व पर्यावरण विषयक बाबींच्या मागे आहोत असे सुचित केले .

# वक्तृत्व चांगले असेल तर कोणत्याही क्षेत्रात कमी पडणार नाही : प्रभावती घोगरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळून आत्मविश्वास वाढतो. चांगले वाचन असेल तर भाषणही प्रभावी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जपत जास्तीत जास्त वाचन करावे. ज्याचे वक्तृत्व चांगले आहे, तो कोणत्याही क्षेत्रात कमी पडणार नाही, असे प्रतिपादन कृषीभूषण सौ. प्रभावतीताई जनार्दन घोगरे-पाटील यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालय, कोल्हार बु. येथे माधवराव खर्डे-पाटील स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. वाचन संस्कृती कमी होत असल्याने भाषणाचा दर्जाही घसरत असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

स्पर्धेचे निमंत्रक ॲड. सुरेंद्र खर्डे-पाटील यांनी स्पर्धेचा विस्तार वाढत असून विद्यार्थ्यांचा सहभागही वाढत असल्याचे सांगितले. सन २०२७-२८ पासून दोन्ही गटांसाठी एकूण २२ हजार रुपयांची बक्षिसे देण्याची घोषणा त्यांनी केली.



मोठ्या गटात दीपक उत्तम येवले प्रथम, तर लहान गटात गौरवी दत्तात्रय कोळपे प्रथम आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामनाथ देवकर-पाटील होते. प्राचार्य अंकुशराज जामदार यांनी प्रास्ताविक केले. शब्बीर शेख यांनी स्पर्धेचा इतिहास सांगितला. सूत्रसंचालन संग्राम गोपाळे यांनी केले, तर दीपक मगर यांनी आभार मानले.

# रामकृष्ण आश्रमात ध्वजारोहणाने श्री एकनाथी भागवत पारायण सुरु

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील श्री विठ्ठल रुख्मिणी आध्यात्मिक केंद्र संचलित रामकृष्ण आश्रमामध्ये रविवार दि.२० सप्टेंबर पासून दहा दिवसीय श्री एकनाथी भागवत पारायण सोहळयास आश्रमाचे प्रमुख महंत गुरुवर्य वेदमूर्ती भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहणाने भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.



दहा दिवसीय श्री एकनाथी भागवत पारायण सोहळयाच्या शुभारंभ प्रसंगी आश्रमातील विघ्नहर्ता गणरायासह, मंदिरातील श्री विठ्ठल रुख्मिणी,संत ज्ञानेश्वर महाराज ,संत तुकाराम महाराज,शांतीब्रम्ह संत श्री एकनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे व एकनाथी भागवत ग्रंथाचे पूजन गुरुवर्य महंत श्री भगवान महाराज जंगले शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आश्रमाचे सेवेकरी हभप निलेश महाराज रोडे,श्री हरी महाराज वाकचौरे,नामदेव महाराज कंक,तुकाराम महाराज पवार,कानिफनाथ महाराज जाधव,शिवाजी महाराज जाधव,शेषराव तात्या जगताप, नंदूभाऊ घावटे,पांडुरंग गारुळे,छोटूभाऊ गोसावी, दादाभाऊ दिघे,पांडुरंग दिघे,रावसाहेब दिघे,बर्डे महाराज, गारुळे महाराज,आश्रमाचे विश्वस्त मंडळ,सरपंच व समस्त ग्रामस्थ गोणेगाव व पंचक्रोशीतील भाविक भक्त रामकृष्ण आश्रमातील विद्यार्थी सेवेकरी वारकरी उपस्थित होते.

या सोहळ्यात पहाटे ४ ते ६ काकडा आरती,सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, सकाळी ७ ते दुपारी १२ पर्यंत श्री एकनाथी भागवत पारायण,मध्यंतरी नाष्टा व दुपारी भोजन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ याप्रमाणे दैनंदिन कार्यक्रम आयोजित केलेले आहेत.

# आश्वी पोलीस स्टेशन येथे गणपती उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशन येथे गणपती उत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन आश्वी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी दीपक बर्डे, श्री पांडे, महेश आहेर, गणपत गोपाळे, राम लहामगे, सचिन सातपुते, विनोद पोटभरे,यांनी केले होते .



याप्रसंगी आश्वी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामस्थ, पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी सत्यनारायण महापूजा संपन्न झाल्यानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. आश्वी पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावातील ग्रामस्थांना आश्वी पोलीस स्टेशन येथे गणपती उत्सवानिमित्त स्नेहभोजनासाठी आमंत्रित केले होते.

विशेष म्हणजे या कार्यक्रमाचे वेळी आश्वी पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आलेल्या पाहुण्यांची जेवणाची व्यवस्था केली होती व स्वतः अधिकारी-कर्मचारी हे नियोजन करत होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट यांनी आलेल्या सर्व ग्रामस्थांचे गणपती उत्सवानिमित्त आपुलकीने स्वागत केले.आश्वी पोलीस स्टेशन येथे गणपती उत्सवामुळे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते परंतु विशेष म्हणजे पोलीस स्टेशन येथे जेवणासाठी ग्रामस्थांना निमंत्रित केले होते. यावेळी असे निदर्शनास आले की, आश्वी पोलीस स्टेशन येथे आलेले ग्रामस्थ हे पाहुणे आहेत आणि त्या पाहुण्यांचा सन्मान व आदरपूर्वक विचारपूस ही आश्वीचे पोलीस अधिकारी व कर्मचारी करत होते.

आज अे निदर्शनास आले की पोलीस स्टेशन येथे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे इतर दिवशी कडक भूमिका घेत असतात, परंतु आज गणपती उत्सवामुळे पोलिसांनी आनंदाने व आलेल्या पाहुण्यांबरोबर आपुलकीने आग्रह करून ''जेवण करा'' असे म्हणत होते. त्यामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा ग्रामस्थां बरोबर आज गणेश उत्सवामुळे चांगला सुसंवाद झाला.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचे सारथी बसचालक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे शाळेत आणणे आणि सुखरूप घरी पोहोचविणे ही केवळ नोकरी नसून पालकांनी चालकांवर ठेवलेल्या विश्वासाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य चालक-मालक महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी यांनी केले.

समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या संकल्पनेतून चालक दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते ५० बसचालकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी काका कोयटे होते.

वाहनचालकांना आम्ही कर्मचारी नव्हे, तर कुटुंबातील सदस्य मानतो. अनेक चालक गेल्या ३० वर्षांपासून समता परिवाराची सेवा करत आहेत, असे काका कोयटे यांनी सांगितले. प्राचार्य समीर अत्तार यांनी चालक हे विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाचे सारथी असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास अय्युबभाई कच्ची, शैलेशशेठ रावल, सागर कस्तुरे, पांडुरंग राजे व उपप्राचार्या मोहिनी जगताप उपस्थित होते. सूत्रसंचालन श्वेताली सदाफळ यांनी केले.

# मियासाहेब पतसंस्थेचा १६५ कोटींच्या ठेवींचा टप्पा पार

## आर्थिक शिस्त व पारदर्शक कारभारामुळे यश; सभासदांना ११ टक्के लाभांश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मियासाहेब ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेने ३३ वर्षांच्या वाटचालीत पारदर्शक कारभार, आर्थिक शिस्त आणि अत्याधुनिक सुविधांच्या जोरावर १६५ कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केला आहे. सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन शामराव निमसे यांनी केले.

टाकळीमिया (ता. राहुरी) येथील महादेव मंदिर प्रांगणात संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत पार पडली. त्यावेळी निमसे बोलत होते. संस्थेने अल्प दरात टँकर सुविधा उपलब्ध करून दिली असून, स्वर्गीय शंकरराव निमसे (तात्या) यांच्या जयंतीनिमित्त आयोजित नेत्र तपासणी शिबिरातून १२०० रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही तात्यांच्या आदर्शाने संस्थेची प्रगती सुरू ठेवण्याचा




निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सभेच्या प्रारंभी दिवंगत सैनिक, संस्थेचे दिवंगत सभासद, थोर नेते व साहित्यिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करण्यात आले. या सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकासही मान्यता देण्यात आली.

संस्थेच्या थकीत कर्जाच्या वसुलीस गती देण्याबाबत चर्चा झाली. संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या कर्जाचा तपशील सभेसमोर जाहीर करण्यात आला. आगामी आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करण्यासही मंजुरी देण्यात आली. सभासदांना ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. परिसरातील विद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांनी पारदर्शक कारभार व उत्कृष्ट सेवेमुळे संस्थेने विश्वास संपादन केल्याचे सांगितले. पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानदेव निमसे यांनी संस्थेने गावासाठी पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल घेतल्याबद्दल कौतुक करून कन्यादान योजना राबविण्याची सूचना केली.

यावेळी भारत वारुळे, लिलाबाई गायकवाड, सुरेशराव निमसे, रवींद्र मोरे, प्रभाकर करपे यांच्यासह संस्थेचे संचालक, विविध बँकांचे अधिकारी, कर्मचारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपाध्यक्ष अशोक शिंदे यांनी स्वागत केले. अनिरुद्ध लोखंडे यांनी विषयपत्रिका व वार्षिक कामकाजाची माहिती दिली. गीताराम चोथे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

# शहीद जवान अशोक डेंगळे यांचा ६२ वा शहीद दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी : निमगाव जाळी :** देशाच्या रक्षणासाठी १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात वीरमरण आलेले निमगाव जाळीचे वीर सुपुत्र शहीद जवान अशोक ज्ञानदेव डेंगळे यांचा ६२ वा शहीद दिन निमगाव जाळी येथे देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. स्मारकस्थळी उपस्थितांनी शहीद जवान अशोक डेंगळे यांच्या शौर्याला, त्यागाला आणि सर्वोच्च बलिदानाला भावपूर्ण अभिवादन केले.

शहीद जवान अशोक ज्ञानदेव डेंगळे हे १९६२ मध्ये भारतीय सैन्यात भरती झाले होते. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी शत्रूशी लढताना त्यांना वीरमरण आले. त्यांच्या शौर्यपूर्ण बलिदानाच्या स्मरणार्थ निमगाव जाळी येथे उभारण्यात आलेल्या स्मारकस्थळी शहीद दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम्, जय जवान, जय किसान तसेच 'शहीद जवान अशोक डेंगळे अमर रहे' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.




यावेळी सुभेदार मेजर यशवंत पवार, सुभेदार मेजर शिवाजी थेटे, सुभेदार सुरेश थेटे, नायक अशोक थेटे, हेड कॉन्स्टेबल शिवाजी वर्पे, नायक काशीनाथ बिडवे, माजी जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे, प्रवरा बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, सरपंच प्रतिभा जोंधळे, उद्योगपती बाबा डेंगळे, दिलीप डेंगळे, दिलीप शिवाजी डेंगळे (संस्थापक, स्मारक समिती, निमगाव जाळी), उपसरपंच वैभव वदक, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आरगडे, सोमनाथ डेंगळे, लंगोटे सर, ज्ञानेश्वर डेंगळे, एकनाथ जोंधळे, संजय थेटे, राम गायकवाड, भाऊसाहेब डेंगळे, प्रभाकर टिळेकर, गोपाळ जोंधळे, सोमनाथ थेटे, सचिन डेंगळे, प्रकाश वदक, राजू डेंगळे यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभेदार मेजर यशवंत पवार यांनी केले. त्यांनी भारतीय सैन्याचे शौर्य, सैनिकांचा त्याग आणि शहीद जवानांच्या सर्वोच्च बलिदानाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर पंडित नेहरू विद्यालयात इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. सुभेदार मेजर यशवंत पवार यांनी भारतीय सैन्यातील विविध संधी, सैन्य भरतीची तयारी, भरती प्रक्रिया आणि उमेदवारांना येणाऱ्या अडचणी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सैन्यात भरती होण्यासाठी शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास, शारीरिक तंदुरुस्ती, मेहनत आणि आत्मविश्वास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यालयाने मागणी केल्यास विद्यार्थ्यांसाठी सैन्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. मातृभूमीसाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या शहीद जवान अशोक डेंगळे यांच्या स्मृती पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठराव्यात, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

## गणेशोत्सवानिमित्त अनिल महाराज देवळेकर यांचे सोमवारी कीर्तन



**संगमनेर** : संगमनेर शहरानजीक असलेल्या घुलेवाडी येथे गणेशोत्सवानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तरुण मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित कीर्तनाचे आयोजन केले आहे. याच उपक्रमांतर्गत सोमवार, दि.२१सप्टेंबर२०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हिंदुत्ववादी कीर्तनकार अनिल महाराज देवळेकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. घुलेवाडी येथील आमदार अमोल खताळ पाटील यांच्या निवासस्थानी समोरील परिसरात हे कीर्तन होणार आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमातून भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यात येणार आहे. अनिल महाराज देवळेकर यांच्या प्रभावी कीर्तनातून उपस्थित भाविकांना छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास उलगडून दाखविणार आहे. या कीर्तन कार्यक्रमास घुलेवाडी तसेच संगमनेर शहर व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज तरुण मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आठवलेंची लंडनमधील आंबेडकर संग्रहालयाला भेट



**शिर्डी** : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय-स्मारकाला भेट देऊन डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. किंग हेन्री रोडवरील या स्मारकाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १४ नोव्हेंबर २०१५ रोजी उद्घाटन करण्यात आले होते. आठवले यांनी स्मारकाची पाहणी केली.

इमारतीच्या डागडुजी व दुरुस्तीची गरज असल्याचे सांगत, संवर्धन आणि देखभालीसाठी आवश्यक दुरुस्ती करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संग्रहालयात डॉ. आंबेडकरांचे जीवनचरित्र, संविधान सभेतील भाषणे आणि महत्त्वपूर्ण भाषणांचे ध्वनिचित्रफिती दाखविणारे दालन उभारावे, अशी सूचना त्यांनी केली. यावेळी त्यांच्या पत्नी सीमाताई आठवले, पुत्र जीत आठवले, चंद्रशेखर कांबळे, माधुरी कांबळे, अविनाश कांबळे, माधुरी अविनाश कांबळे, गौतमी कांबळे, दीक्षा कांबळे आदी उपस्थित होते.

## कोपरगावात २६ व २७ सप्टेंबरला खुल्या बुद्धिबळ स्पर्धा

**कोपरगाव** : बुद्धिबळ खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, खेळाडूंची एकाग्रता, बौद्धिक क्षमता व निर्णयक्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने संजीवनी युवा प्रतिष्ठान व कोपरगाव चेस अँड स्पोर्ट्स क्लबच्या संयुक्त विद्यमाने 'आमदार विवेकभैय्या कोल्हे खुल्या बुद्धिबळ स्पर्धा २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे पाचवे वर्ष असून, शनिवार व रविवार, दि. २६ व २७ सप्टेंबर रोजी स्पर्धा होणार आहे. स्पर्धेत खुल्या गटासह १२, १४ व १९ वर्षांखालील गट, महिला व मुलींसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. विजेत्या व गुणवंत खेळाडूंना रोख पारितोषिके व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र मिळणार आहे. स्पर्धा स्विस लीग पद्धतीने फिडेच्या नियमानुसार होणार असून, स्पर्धकांनी स्वतःचा बुद्धिबळ पट आणणे आवश्यक आहे. नोंदणीची अंतिम मुदत २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत आहे. स्पर्धेला २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सुरुवात होणार आहे. इच्छुकांनी संकेत गाडे (७८७५६७३२३३), महेश थोरात (९४२२६६७७९२), प्रमोद वाणी (९३५९४७७१७७) किंवा नितीन सोळके (९८९०४८९०३३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# प्रवरा यंदा १२ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करणार : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर / झरेकाठी** : दुष्काळी परिस्थिती, घटलेले ऊस उत्पादन आणि पाणीटंचाई अशा प्रतिकूल परिस्थितीत यंदाचा गळीत हंगाम साखर उद्योगासाठी आव्हानात्मक असला, तरी संकटांवर मात करण्याची प्रवरेची ऐतिहासिक परंपरा आहे. सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून यंदाचा गळीत हंगाम यशस्वी करण्याचा संकल्प करूया; कारखाना १२ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट निश्चितपणे पूर्ण करेल, असा विश्वास जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभात ते बोलत होते.




ज्येष्ठ मार्गदर्शक तथा माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कारखान्याचा बॉयलर अग्नीप्रदीपन सोहळा संपन्न झाला. या वेळी ना. राधाकृष्ण विखे पाटील व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांच्यासह कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, व्हा. चेअरमन सोपानराव शिरसाठ, प्रवरा बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे, कैलास तांबे, उपसभापती अण्णासाहेब कडू, ट्रक वाहतूक संस्थेचे उपाध्यक्ष सुनील जाधव, चेअरमन मकरंद गुणे, व्हा. चेअरमन विजय लगड, शांतीनाथ आहेर आणि कार्यकारी संचालक महेश कोनापुरे यांच्यासह सर्व संचालक, सभासद, कामगार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी संचालक रंगनाथ भाऊराव उंबरकर, रामप्रसाद मगर, श्रीकांत खर्डे, दिलीप यादव यांच्या हस्ते सपनिक बॉयलरचे विधिवत पूजन करण्यात आले. या समारंभाच्या निमित्ताने औपचारिकरीत्या उसाच्या मोळीचे पूजनही करण्यात आले. या वेळी बोलताना ना. विखे पाटील म्हणाले की, राज्य सरकारने सहकारी साखर कारखाने लवकर सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा थेट फायदा होणार आहे. केंद्र व राज्य सरकारच्या साखर धोरणामुळे सहकारी साखर कारखानदारीला मोठा आर्थिक आधार मिळाला आहे.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा ऊस उत्पादनावर मोठा परिणाम होणार असून, अनेक भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे धरणांमध्ये उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याचे चोख नियोजन करावे लागणार आहे. पिण्याच्या पाण्याला आमचे सर्वोच्च प्राधान्य असून, शेतीच्या पाण्यासाठीही योग्य नियोजन करून ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणी कसे राखून ठेवता येईल, असा जलसंपदा विभागाचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करावे आणि उसाचे एकरी उत्पादन कसे वाढविता येईल यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन करून मंत्री विखे पाटील म्हणाले की, यंदाच्या गाळप हंगामापुढे नैसर्गिक परिस्थितीचे मोठे आव्हान आहे.

मात्र, यावर मात करून प्रवरा कारखान्याने यंदा १२ लाख मेट्रिक टन गाळपाचे जे उद्दिष्ट ठेवले आहे, ते सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून निश्चितपणे पूर्ण होईल. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी कारखाना वेळेत सुरू करण्यासाठी व्यवस्थापनाने केलेल्या नियोजनाचे कौतुक केले. पूर्ण क्षमतेने कारखाना चालविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे सांगतानाच दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता पुढील वर्षी ऊस लागवडीसाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहित करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी यंदा कारखाना वेळेत गळीत हंगामासाठी सज्ज केल्याबद्दल कामगारांच्या परिश्रमांचे कौतुक केले. अहिल्यानगर जिल्ह्यात उच्चांकी गाळप आणि उच्चांकी साखर उतारा देणारा कारखाना म्हणून प्रवरा कारखान्याची अग्रगण्य कामगिरी राहावी, यासाठीचे सूक्ष्म नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी आणि प्रवरा उद्योग समूहातील सर्व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## ढोरजळगाव ने येथे 'भव्य मॅरेथॉन स्पर्धा' उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगे पाटील शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुल, ढोरजळगाव-ने यांच्या वतीने वार्षिक सैनिक प्रशिक्षण २०२६ अंतर्गत रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी 'भव्य मॅरेथॉन स्पर्धा व्हीक्टोरि'रण मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आली होती.या मॅरेथॉन स्पर्धेचा शुभारंभ कर्नल के. पी. सिंग सर, ढोरजळगाव-ने शैक्षणिक संकुलाचे मार्गदर्शक सुखदेव पाटील कराड तसेच महाराष्ट्र पोलीस संदीप पाटील गिऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी संकुलाचे प्रशासक सचिनराव कर्डिले, सीनियर कॉलेजचे प्राचार्य सुनील चोळके,फार्मसी कॉलेजचे प्राचार्य विनोद भोईटे, उपप्राचार्य गिऱ्हे, प्राचार्य आशिष भारती, पब्लिक स्कूलचे प्राचार्य संजय बुधवंत, नवनाथ उकिर्डे, श्रीराम बडे, डॉ. देविदास देशमुख तसेच आजच्या मॅरेथॉन स्पर्धेला ज्यांचं मोलाचं सहकार्य मिळालं ते त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाची टीमचे मेजर परमेश्वर कसाळ, मेजर प्रशांत खताळ, मेजर सचिन करोतीया, मेजर इम्रान खान,मेजर शेख आसिफ, ढोरजळगाव ने संकुलातील प्रशिक्षक आकाश मिसाळ, दीपक कोठे, प्रशांत थोरात, रविंद्र कोकरे तसेच सर्व विभाग प्रमुख सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या दोनशे धावपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत व्हीक्टोरि'रण ला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, चिकाटी, आत्मविश्वास, नेतृत्वगुण व देशसेवेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगे पाटील शैक्षणिक संकुल येथून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. व तेलकुडगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ दुसरे टोकन देऊन धावपटूंनी पुन्हा संकुलाकडे धाव ठोकली. सहभागी धावपटूंसाठी मार्गावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. वार्षिक सैनिक प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना क्रीडा, शिस्त आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा हा उपक्रम ठरला. परिसरातील नागरिक, पालक व क्रीडाप्रेमींनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

## संजीवनी युनिव्हर्सिटीच्या दोन टीमचे राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धेतील स्थान टॉप टेन मध्ये

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव** : संजीवनी युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी मधिल आर्टीफिशियल इंटीलिजन्स अँड मशीन लर्निग (एआयएमएल) विभागातील दोन टिमने कोयंबतुर (तामिळनाडू) येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आयबीएम नॅशनल हॅकाथॉन २०२६ या अभियांत्रिकी विध्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवुन देशातील सुमारे ४०० टीम मधुन पहिल्या सर्वोत्कृष्ट १० टीम मध्ये स्थान मिळविले. संजीवनी युनिव्हर्सिटी जरी ग्रामीण भागात असली तरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे सिध्द केले. दोनही टीमच्या दोनही प्रोजेक्टवर पुढील संशोधन करण्यासाठी आयबीएम प्रत्येकी रू ५ लाखांचे अर्थ सहाय्य देण्याचे नमुद केले आहे. आयबीएम नॅशनल हॅकाथॉन या स्पर्धेत विद्यार्थी वास्तविक उद्योग क्षेत्रातील आव्हानांवर नाविन्यपूर्ण कल्पना आणि सहकार्याच्या माध्यमातून उपाय शोधतात आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांचा प्रत्यक्ष परिचय पंचासमोर सादर करतात. प्रथम उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांकडून विविध वास्तविक समस्यांची यादी दिली जाते. या स्पर्धेत नेहा संजय चव्हाण, पायल सतीश गायकवाड, ओंकार दत्तात्रय वाकचौरे व अपर्णा प्रकाश मतसागर यांच्या टीमने 'सायबर सिक्युरिटी' या समस्येवर सादरीकरण दिले तर दिगंबर अर्जुन महाजन, रोहित संदीप तुपे, अजित देविदास नवले व आदित्य संतोश गांगुर्डे यांच्या टीमने ' रोड सेफ्टी इन इंडिया' या समस्येवर सादरीकरण दिले. परीक्षकांनी नावीण्यपूर्ण कल्पना, तांत्रिक गुणवत्ता, समस्या सोडविण्याची क्षमता, व्यावहारीक उपयोगीता आणि सादरीकरण कौशल्य या निकषांवर आधारीत दोनही टीमला देशातील पहिल्या दहा टीममध्ये निवड केली. या विध्यार्थ्यांना प्रा. सौहरद्या गायेन व प्रा. शिवानी पामु यांनी मार्गदर्शन केले.



# निळवंडेच्या पाण्याने औरंगपूरला दुष्काळात दिलासा; तलाव भरले, पिकांना जीवदान!

## गोरक्षवाडीतील शेतकऱ्यांकडून डॉ. सुजय विखे यांचा सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : संगमनेर तालुक्यातील औरंगपूर-गोरक्षवाडी परिसरात पावसाने दडी मारल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असताना निळवंडे कालव्यातून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे गावातील तलाव पूर्ण क्षमतेने भरले आहेत. त्यामुळे परिसरातील विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होऊन ऐन हातातोंडाशी आलेल्या सोयाबीन, ऊस, कांदा, बाजरी, कपाशी आणि मका या पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



या पाणीपुरवठ्याबद्दल औरंगपूर-गोरक्षवाडीतील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली निळवंडे धरणातून पाटपाणी सोडण्यात आले. तसेच डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून लोहारे-गोगलगाव पाटातून अतिशय खडकाळ भागातून खोलवर खोदकाम करून पाईपलाईनद्वारे शनेश्वर पाझर तलावासह औरंगपूर परिसरातील गाव तलावांमध्ये पाणी पोहोचविण्यात आले. यंदा अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने परिसरातील शेतकरी चिंतेत होते.

मात्र निळवंडेचे पाणी तलावांमध्ये पोहोचल्याने पाणीसाठ्याला मोठा आधार मिळाला. तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे भूजलपातळी वाढण्यास मदत होऊन विहिरी व बोअरवेलला पाणी उपलब्ध झाले. परिणामी पिकांना आवश्यक त्या वेळी पाणी मिळाल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. औरंगपूर-गोरक्षवाडी परिसरातील रस्ते, वीज, पाणी, सभामंडप, हायमॅक्स पथदिवे यांसह विविध विकासकामांनाही चालना मिळाली आहे. निळवंडेचे पाणी या परिसरात पोहोचल्याने शेतकऱ्यांना दुष्कअ ाळाची झळ जाणवू दिली नाही. तलाव भरल्याने पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण झाला आहे, असे जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जनसेवा मंडळाचे अध्यक्ष विजयराव डेंगळे, माजी उपसरपंच इंद्रभान तांबे, योगेश वदक, शामराव वदक, अरुण वदक, वैभव चोपडे, भारत वदक, संदीप वदक, सुमित डेंगळे, साईराज वदक आदींसह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## भामाठाण शिवारात माय -लेक वाघावर बिबट्याचा हल्ला, आई गंभीर जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : भामाठान शिवारात खानापूर रस्त्यालगत सकाळी मोटारसायकल वर शेतात चाललेल्या मोटारसायकल स्वार रावसाहेब हरिश्चंद्र वाघ( वय ३५) पाठीमागे बसलेली त्यांची आई ताराबाई हरिश्चंद्र वाघ ( वय ६०) या दोघांवर उसाच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने घालू मोटारसायकल वर अचानक हल्ला केला. आज रविवार दि.२० सप्टेंबर रोजी सकाळी ८ च्या सुमारास ही घटना घडली. काही क्षणार्धात मोटारसायकल रस्त्यावर पडून थोड्या अंतरावर पुढे रावसाहेब जाऊन पडला.मात्र मागे बसलेली आई ताराबाई बिबट्याचे तावडीत सापडली. झटापटीत ताराबाईचे हातात गवत कापण्याचा धारदार विळा असल्याने त्यांनी प्रतिकार केला. यामध्ये बिबट्याचज पंजाने ताराबाईचे डोक्यावर कानावर व हातावर गंभीर जखमा झाल्या. हातातील विळ्याने प्रतिकार केल्याने अन् मुलगा रावसाहेब मदतीला धावून आल्याने बिबट्यास ताराबाईची शिकार करता आली नाही. अन्यथा मानगुटीवर हल्ला करून फरपटत उसात नेले असतें. मोटारसायकलवरून पडल्याने अन आईला वाचविताना बिबट्याने रावसाहेब यास पंजे मारून किरकोळ जखमी खैर आहे.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे गणेशवाडी, सोनई ता. नेवासा जि. अहिल्यानगर तसेच अहिल्यानगर जिल्हा परिसरातील सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे गणेशवाडी, ता. नेवासा येथील गट नंबर ३०७/२/क क्षेत्र ० हे. ८१ आर आकार ३ रु. ०५ पैसे ही जमिन आमचे अशिल तुकाराम जगन्नाथ लोहकरे रा. सोनई, ता. नेवासा यांनी सदर मिळकत १) भाऊसाहेब जवाजीराम रोकडे, २) रावसाहेब जवाजीराम रोकडे, ३) बाबासाहेब जवाजीराम रोकडे, सर्व रा. म्हैसगांव, ता. राहुरी, जि अहिल्यानगर, ४) ताराबाई बाबाजी हारदे, रा. दरडगांव, ता. राहुरी जि. अहिल्यानगर, ५) मिराबाई बाबासाहेब ढवळे रा. बेलकरवाडी, ता. राहरी जि. अहिल्यानगर यांचेबरोबर सदर जमिनीचा साक्षीदारासमक्ष सौदा करुन त्यांनी आमचे अशिलास साठेखताचा दस्त लिहुन नोंदवुन दिलेला आहे. त्यानुसार सदर जमिनीची विक्रीची परवानगी आणुन १ महिण्याच्या आत खरेदीखत करुन देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे परवानगी आणुन त्याची नोंद ७/१२ रेकॉर्डला झालेली आहे.

ठरल्याप्रमाणे आमचे अशिल सदर जमिनीचा राहिलेली रक्कम देवुन खरेदीखत करुन घेण्यास सदैव तयार होते व आहे. परंतु वरील इसमांनी खरेदीखत करुन देण्यास टाळाटाळ चालविली आहे. व इतरांशी विक्रीची सौदेबाजी सुरु केल्याचे आमचे अशिलास खात्रीलायक समजले आहे.

अश्या परीस्थितीत मौजे गणेशवाडी, ता. नेवासा येथील गट नं. ३०७/२/क क्षेत्र ० हे. ८१ आर जमिनीचा वरील इसमांशी कुणीही कोणत्याही प्रकारे हस्तांतरणाचा दस्त करु नये व इतर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. तसे केल्यास सदर व्यवहार करणाऱ्यास काहीएक हक्क अधिकार मिळणर नाही. याची नोंद घ्यावी. असे असतांना कुणी काही व्यवहार केल्यास त्याचे खर्चाची व परीणामाची व आमचे अशिलाचे नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी लिहुन घेणार यांचेवर राहील याची नोंद घ्यावी. केवळ लोक हितासाठी, इतरांस कोणतीही बाधा येवु नये व भविष्यात वाद उद्भवु नये म्हणुन ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक - २०/०९/२०२६
**नोटीस देणार**
**(तुकाराम जगन्नाथ लोहकरे)**

**नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. तात्यासाहेब बापूसाहेब पा. ढोकणे**
**बी.ए. (ऑनर्स), एल एल.बी.**
**नेवासा ॲडव्होकेट**
**मो.९४२३३८७२५५**

**SUPRIYADIDI SULE COLLEGE OF NURSING** College Code 153110

**P.B.B.SC. NURSING ADMISSION NOTICE 2026-27**

Applications are invited from eligible candidates for admission P.B.B.Sc. Nursing course for the Academic Year 2026-27, for the following courses rounds.

P.B.B.Sc. Nursing | Intake 90 | Eligibility GNM, RGNM Pass

The detailed schedule for the admission process is shown below:

| Schedule | P.B.B.Sc. Nursing |
|---|---|
| Issue of Application form and prospectus. | 16 Sept. 2026 to 22 Sept. 2026 |
| Last date of filling of application form. | 22 Sept. 2026 5.00 pm |
| Display of Merit list | 23 Sept. 2026 6.00 pm |
| Confirmation of admission by depositing fees & documents. | 24 Sept. 2026 to 30 Sept. 2026 |
| Cutoff date for all the type of admission | 30 Sept. 2026 |

Interested students are required to visit college office between 10.00 am to 05.30 pm for filling the application form at the following address.

College Add : Survey No.3, Shrirampur-Newasa Road, Wadala Mahadev, Tq. Shrirampur, Dist. Ahilyanagar.

9607960147| 9765500250 | 9075521379

**Aurangabad College of Nursing** College Code 154102

**P.B.B.SC. /M.Sc.NURSING ADMISSION NOTICE 2026-27**

Applications are invited from eligible candidates for admission P.B.B.Sc. /M.Sc. Nursing course for the Academic Year 2026-27, for the following courses rounds.

P.B.B.Sc. Nursing — Eligibility : GNM, RGNM Pass
M.Sc. Nursing — पात्रता : बी.एस्सी/पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग ॲण्ड १ वर्षाचा अनुभव

The detailed schedule for the admission process is shown below:

| Schedule | P.B.B.Sc. / M.Sc.Nursing |
|---|---|
| Issue of Application form and prospectus. | 16 Sept. 2026 to 22 Sept. 2026 |
| Last date of filling of application form. | 22 Sept. 2026 5.00 pm |
| Display of Merit list | 23 Sept. 2026 6.00 pm |
| Confirmation of admission by depositing fees & documents. | 24 Sept. 2026 to 30 Sept. 2026 |
| Cutoff date for all the type of admission | 30 Sept. 2026 |

Interested students are required to visit college office between 10.00 am to 05.30 pm for filling the application form at the following address.

College Add : Shiva Trust Education Campus, Nipani-Bhalgaon, Beed Highway Road, Near Videocon Comm., Chh. Sambhajinagar-431007

9325444040 | 9325707066 | 9325707033

**NASHIK NURSING COLLEGE** College Code 153118

**P.B.B.SC. /M.Sc.NURSING ADMISSION NOTICE 2026-27**

Applications are invited from eligible candidates for admission P.B.B.Sc. /M.Sc. Nursing course for the Academic Year 2026-27, for the following courses rounds.

P.B.B.Sc. Nursing — Eligibility : GNM, RGNM Pass
M.Sc. Nursing — पात्रता : बी.एस्सी/पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग ॲण्ड १ वर्षाचा अनुभव

The detailed schedule for the admission process is shown below:

| Schedule | P.B.B.Sc. / M.Sc.Nursing |
|---|---|
| Issue of Application form and prospectus. | 16 Sept. 2026 to 22 Sept. 2026 |
| Last date of filling of application form. | 22 Sept. 2026 5.00 pm |
| Display of Merit list | 23 Sept. 2026 6.00 pm |
| Confirmation of admission by depositing fees & documents. | 24 Sept. 2026 to 30 Sept. 2026 |
| Cutoff date for all the type of admission | 30 Sept. 2026 |

Interested students are required to visit college office between 10.00 am to 05.30 pm for filling the application form at the following address.

प्रवेशासाठी संपर्क : ३ रा मजला, मार्केट यार्ड बिल्डींग, सुयोग हॉस्पिटलच्यावर, दिंडोरी रोड, पंचवटी, नाशिक.

9730728980 | 9975567161

**Shivanjali College of Nursing, Pachegaon** College Code 153128

**P.B.B.SC. /M.Sc.NURSING ADMISSION NOTICE 2026-27**

Applications are invited from eligible candidates for admission P.B.B.Sc. /M.Sc. Nursing course for the Academic Year 2026-27, for the following courses rounds.

P.B.B.Sc. Nursing — Eligibility : GNM, RGNM Pass | Intake 60
M.Sc. Nursing — पात्रता : बी.एस्सी/पी.बी.बी.एस्सी. नर्सिंग ॲण्ड १ वर्षाचा अनुभव

The detailed schedule for the admission process is shown below:

| Schedule | P.B.B.Sc. / M.Sc.Nursing |
|---|---|
| Issue of Application form and prospectus. | 16 Sept. 2026 to 22 Sept. 2026 |
| Last date of filling of application form. | 22 Sept. 2026 5.00 pm |
| Display of Merit list | 23 Sept. 2026 6.00 pm |
| Confirmation of admission by depositing fees & documents. | 24 Sept. 2026 to 30 Sept. 2026 |
| Cutoff date for all the type of admission | 30 Sept. 2026 |

Interested students are required to visit college office between 10.00 am to 05.30 pm for filling the application form at the following address.

College Add : Shiva Trust Education Campus, Pachegaon, Tq. Newasa, Dist. Ahilyanagar-413725

Call Now : 9270929522 | 8668292318

## पान १ वरुन

### डिंभे–माणिकडोह बोगद्याआधी श्रीगोंद्याच्या राजकारणातील भगदाड जनतेसमोर !

दरेकर यांनी 'आत गुप्तगु करायची होती तर आम्हाला बोलावले कशाला?' असा सवाल दरेकर यांनी उपस्थित केला. त्यानंतर डिंभे–माणिकडोह बोगद्याच्या चर्चेदरम्यान दरेकर बोलत असताना त्यांना थांबविण्यात आल्याने त्यांनी 'आम्हाला राम शिंदे साहेबांना भेटूही दिले जात नाही आणि बोलूही दिले जात नाही; हा कसला प्रकार?' असा सवाल उपस्थित केला. 'आम्ही अनेक दिवसांपासून त्यांचे कार्यकर्ते आहोत, त्याचे पुरावे आमच्याकडे आहेत,' असेही त्यांनी ठणकावून सांगितल्याचे समजते.हा प्रकार प्रा. राम शिंदे यांच्या उपस्थितीतच घडल्याने वातावरण तापले. त्यानंतर दरेकरांना बोलण्याची संधी देण्यात आली आणि त्यांनी तालुक्यातील राजकीय परिस्थिती व प्रश्न मांडले. बोगद्याचा प्रश्न सुटण्याआधीच श्रीगोंद्याच्या राजकारणातील अंतर्गत मतभेदांचा 'बोगदा' मात्र जनतेसमोर आला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### आकारी पडित लाभार्थ्यांकडून गिरीधर आसने यांचा सत्कार

पदाधिकारी भारावून गेले. याप्रसंगी भाजपा मुळ याचिकाकर्ते गिरीधर आसने,जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, माजी तालुकाध्यक्ष दिपक पटारे,तालूकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, डॉ शंकर मुठे भिमभाऊ बांद्रे, गणेश मुदगुले,शरद नवले, अभिषेक खंडागळे, किशोर बनसोडे,भैरव कागुणे,विजय दवंगे, अशोकचे माजी संचालक नामदेव आदिक, खानापूरचे सरपंच ज्ञानदेव आदिक, अशोक ग.आसने, संजय का. आसने,रामा वि.आसने ,संदिप डाखे, रमेश पा.आसने, दादासाहेब मोरे, लक्ष्मण आसने, रावसाहेब काळे, अनिल आसने, ज्ञानदेव आसने,सखाहरी हुरूळे, भाऊसाहेब मुठे दत्तात्रय काळे, अशोक खताळ, सचिन बा..आसने, रवी द.शिंदे, बाळू लटमाळे, सदाशिव आसने, शिवाजी बँक.आसने, बबनर आसने, शालिनीताई झुराळे, गजानन आसने ल संदिप आसने, दादासाहेब अनुसे, बाळासाहेब ठ.आसने, दादासाहेब बोर्डे, दिलीप हुरूळे, सचिन शेळके आदी दोन अडीचशे कार्यकर्ते उपस्थित होते. अॅड. अजित काळे यांचे चळवळीत कार्यकर्ते रात्रीतून गिरीधर आसने यांच्या तंबूत जमिनी ताब्यात मिळण्याचे आत अकारी पडीत शेतकऱ्यांचे लाभधारक अँड अजित काळे समर्थक फोडण्याची रणनीती अआज कटाक्षाने दिसुन आली. अँड अजित काळे यांच्या हरिगांव येथील ऊपोषणार्थी ज्येष्ठ लढवय्या महिला भगिनी शालिनीताई झुराळे व आतापर्यंत अँड अजित काळे यांच्या खांद्याला खांदा लावून संघर्ष करणारे माळवाडगावातील काही लाभधारक स्वतः कडे खेचण्यात गिरीधर आसने यांनी यश मिळविले.

### अकारी पडीत जमिनींचे वाटप खंडकरी धर्तीवरच

मार्गी लावल्याबद्दल अकारी पडीत चळवळीचे नेते अॅड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली लाभधारक शेतकऱ्यांनी विखे पाटील यांचा सत्कार केला. यावेळी विखे पाटील म्हणाले, शेतकरी हिताचा कोणताही प्रश्न सोडविण्याचा ध्यास घेतला की तो मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्न करतो. प्रशासकीय पातळीवर अनेक अडचणी येतात; मात्र टीकेकडे दुर्लक्ष करून काम पूर्ण करण्यावर भर असतो. अकारी पडीत जमिनींच्या वाटपासाठी खंडकरी जमिनींच्या वाटपाप्रमाणे नियोजन करण्यात येईल. यावेळी सचिन वेताळ, शरद आसने, सतीश नाईक, बाळासाहेब बकाल, सागर गिऱ्हे, बापूसाहेब गोरे, सोपान नाईक, साहेबराव चोरमल, बबनराव नाईक, दिलीप गलांडे, राजेंद्र नाईक, भरत आसने, अशोक गुळवे, शिवाजी आढाव, दादासाहेब गायके, रावसाहेब गलांडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

...खिशात बॉम्ब टाकून मंत्र्याला मिठी मारू

असताना सरकारकडून ठोस आर्थिक मदतीची मागणी होत आहे. मात्र, प्रत्यक्ष मदत मिळण्यास विलंब होत असल्याच्या भावनेतून शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर एका तरुण शेतकऱ्याने संतप्त प्रतिक्रिया देताना आत्महत्येऐवजी मंत्र्यांना लक्ष्य करण्याची धमकी दिल्याचे समोर आले आहे. त्याच्या या वक्तव्यामुळे प्रशासन आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मात्र अशा हिंसक धमक्या गंभीर असून त्यांचे समर्थन करता येणार नाही. पावसाची प्रतीक्षा, हाताशी आलेल्या पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च आणि आर्थिक अडचणी यामुळे ग्रामीण भागातील असंतोष तीव्र होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सरकारसमोर आता केवळ दुष्काळी पाहणी नव्हे, तर शेतकऱ्यांपर्यंत मदत प्रत्यक्ष आणि वेगाने पोहोचविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, राज्यातील २० जिल्ह्यांमध्ये २० टक्क्यांहून अधिक पावसाची तूट असल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या आढाव्यात समोर आली होती. अनेक भागांत सलग दीर्घकाळ पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर परिणाम झाला आहे.

### अंगणवाडी सेविकांना पर्यवेक्षिका होण्यासाठी वयोमर्यादेचा अडसर दूर!

अनिल किलोर व न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या खंडपीठाने ४५ वर्षांची अट घटनाबाह्य ठरवत रद्द केली. न्यायालयाने निरीक्षण नोंदविले की, अंगणवाडी सेविकांना ६५ वर्षांपर्यंत सेवा करण्याची परवानगी असताना, पर्यवेक्षिका पदासाठी केवळ ४५ वर्षांची कमाल मर्यादा लावणे तर्कसंगत ठरत नाही. त्यामुळे समान पात्रता असलेल्या सेविकांमध्ये केवळ वयाच्या आधारे भेद निर्माण होत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निर्णयानंतर शासनाने ३ जुलै २०२६ रोजी नवीन निर्णय काढून कमाल वयोमर्यादा ४५ वरून ५० वर्षे केली. त्यानुसार २०२६–२७ च्या पदोन्नती प्रक्रियेत मुख्यसेविका/पर्यवेक्षिका पदासाठी २७२ पदांची पदोन्नती कोट्यातील भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, ५० वर्षांची अटही न्यायालयीन आव्हानास सामोरी गेली.

फरिदा मुस्ताक मुल्ला विरुद्ध महाराष्ट्र शासन या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ३ जुलैचा शासन निर्णय रद्द केला. न्यायमूर्ती शर्मिला यू. देशमुख आणि न्यायमूर्ती नीरज डी. धोटे यांच्या खंडपीठाने १७ नोव्हेंबर २००१ चा शासन निर्णय आणि ७ डिसेंबर २००१ चे दुरुस्तीपत्रक यानुसार ५५ वर्षांपर्यंतच्या सेविकांना पदोन्नतीसाठी पात्र मानण्याची पूर्वीची व्यवस्था कायम असल्याचे स्पष्ट केले.

### दोन लाखांत 'गुन्हा मॅनेज'!

आले आहे. त्यानंतर तक्रारदाराने मासाळकर यांची भेट घेतली असता, गंभीर गुन्हा दाखल न करता सौम्य स्वरूपाचा गुन्हा दाखल करून लवकर जामीन मिळवून देण्यासह तपासात मदत करण्यासाठी लाचेची मागणी करण्यात आली. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने १८ सप्टेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांच्याकडे तक्रार दिली. तक्रारीची गांभीर्याने दखल घेत एसीबीने १९ सप्टेंबर रोजी पडताळणी केली. पडताळणीदरम्यान तडजोडीनंतर २ लाख १५ हजार रुपये स्वीकारण्याचे निश्चित झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचण्यात आला. पाथर्डी पोलीस ठाण्यालगतच्या पाण्याच्या टाकीजवळ सापळा लावण्यात आला. ठरल्याप्रमाणे तक्रारदाराकडून पंच साक्षीदारांच्या समक्ष एक लाख रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने मासाळकर याला रंगेहाथ ताब्यात घेतले. अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आलेल्या या कारवाईमुळे पाथर्डी परिसरात खळबळ उडाली. या कारवाईचे नेतृत्व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक संतोष पैलकर यांनी केले. पोलीस निरीक्षक सविता तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दिनेश खैरनार, अविनाश पवार आणि पोलीस अंमलदार योगेश शिंदे यांनी सापळा कारवाई यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. पोलीस अधीक्षक भारत तांगडे आणि अपर पोलीस उपअधीक्षक प्रदीप मैराळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

### दुष्काळ जाहीर करा; विकासकामे थांबवा!

'पुढील दहा महिने जगविण्याचे आव्हान' – खरीप हंगामात अनेक भागांत ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झाल्याचा दावा करत रब्बी हंगामाचीही आशा मावळली असल्याचे पवार यांनी सांगितले. जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता असून, पुढील दहा महिने शेतकरी आणि ग्रामीण कुटुंबांना कसे जगवायचे, हा प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे पंचनाम्यांची वाट न पाहता सरकारने तातडीने मदत जाहीर करावी, अशी त्यांची मागणी आहे.

सरकारचीही दुष्काळी पाहणी सुरू

दरम्यान, राज्य सरकारनेही पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या भागांचा आढावा घेऊन पंचनामे करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे दुष्काळ जाहीर करण्याची मागणी आणि सरकारची सुरू असलेली पाहणी यामुळे शेतकरी मदतीचा निर्णय आता केंद्रस्थानी आला आहे.

# मुख्यालयी न राहता घरभाडे उचलणाऱ्या शिक्षकांवर कारवाई होणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर्री** : शिक्षकांनी कितीही दबाव तंत्र वापरला तरी देखील दबावाला बळी न पडता मुख्यालय न राहता घरभाडे उचलणाऱ्या शिक्षकांना कारवाईला सामोरे जावे लागणार असून आतापर्यंत विद्यार्थ्यांचे नुकसान झाले. परंतु भविष्यात भावी पिढीचे नुकसान होऊ दील्या जाणार नाही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना मुख्यालयी राहणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७६ व्या वाढदिवस तसेच २५ वर्ष यशस्वी प्रशासकीय सेवा पूर्ण झाल्याने तालुक्यातील वसुसायगांव येथे 'सेवा संकल्प अभियानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आमदार बंब बोलत होते.



गंगापूर तालुक्यातील वसुसायगांव येथे 'सेवा संकल्प अभियानाचे प्रमुख संतोष जाधव, जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष जाधव यांनी विविध जनहीताच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून हे अभियान १७ सप्टेंबर ते १७ आक्टोबंर पर्यंत चालणार आहे. भीयाना अंतर्गत पुर्ण राज्यात १३ सूत्रीय विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ गंगापुर तालुक्यातील वसुसायगांव येथे किरण पाटील, माजी आमदार राणे यांच्या उपस्थीतीत आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपति संभाजीनगरभाजपा (पश्चिम) च्या वतीने आयोजित हे अभीयान जिल्हा परिषदेच्या महीला व बालकल्याण सभापती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण जिल्ह्यात करण्यात येत आहे.वसुसायगांव येथील अभीयानात आमदार प्रशांत बंब यांची प्रमुख उपस्थिति होती.

अभियाना अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बँच वितरण, रांगोळी स्पर्धा,स्वच्छता अभियान, विकसित भारत संकल्प यात्रा, जनसेवा महोत्सव, नमो सेवा यात्रा,'सपनों का भारत' विषय पर चित्रकला व भाषण, रक्तदान व आरोग्य शिबीर, सत्कार समारंभ आदीसह विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात येणार आहे.

कार्यक्रमात आशा वर्कर्स आंगणवाड़ी सेविकांचा विशेष सम्मान करण्यात आला विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवा संदेश देण्यात आला सेवा संकल्प अभीमान मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, बांधकाम सभापति सचिन गरड , बाजार समिति सभापती शेषराव जाधव,गंगापुर पंचायत समिति सभापती कविता चव्हाण, रविंद्र चव्हाण, कृष्णा सुकासे, कृष्णकांत व्यवहारे,आदीसह जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिति सदस्य, बाजार समिति संचालक, भाजपा पदाधिकारी,आशा वर्कर, आंगनवाड़ी सेविका, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## उपक्रमशील शिक्षक गोरखनाथ त्रिभुवन यांचा गौरव

### शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा बहुमान!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अविरत झटणारे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची जोड देऊन शिक्षणाची गंगोत्री ग्रामीण भागापर्यंत पोहोचवणारे वैजापूर तालुक्यातील चांडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे कर्तव्यनिष्ठ शिक्षक गोरखनाथ त्रिभुवन यांच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव करण्यात आला. साने गुरुजी पतसंस्थेच्या वतीने त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचा सपत्नीक अत्यंत दिमाखात सन्मान सोहळा संपन्न झाला.वैजापूर येथील पंचायत समितीच्या विनायकराव पाटील सभागृहात रविवार (दि. २०) रोजी पार पडलेल्या या सत्कार सोहळ्याने संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात कौतुकाचा सुवर्णयोग साधला. केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देणारे आणि विविध सामाजिक उपक्रम राबविणारे शिक्षक म्हणून त्रिभुवन यांची जिल्हाभरात ओळख आहे. त्यांच्या याच निस्सीम सेवेचा आणि प्रामाणिक प्रयत्नांचा हा गौरव असल्याचे उपस्थितांनी आपल्या मनोगतात सांगितले.या प्रेरणादायी सोहळ्याला तालुक्यातील दिग्गज आणि शिक्षणप्रेमी मंडळींची विशेष उपस्थिती लाभली होती.

यात प्रामुख्याने: जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे, जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील निकम, मनोज पाटील गायके,पंचायत समिती सभापती वंदना शिंदे, साने गुरुजी पतसंस्थेचे चेअरमन शाम राजपूत, भाजपाचे कैलास पवार, माजी सरपंच रणजित देशमुख, राजु राजपूत,आदीसह शिक्षक वर्ग व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिक्षक गोरखनाथ त्रिभुवन यांच्या या गौरवास्पद यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, हा सत्कार इतर शिक्षकांसाठी देखील प्रेरणादायी ठरणार आहे.

## दुचाकीच्या धडकेत पादचारी महिला ठार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकी स्वाराने जोराची धडक दिल्याने महिला ठार झाली.ही घटना शिवराई रस्त्यावर सेंट मोनिका स्कूल जवळ १५ सप्टेंबर रोजी पहाटे घडली. बेबी नामदेव म्हस्के (५४) रा रामवाडी वैजापूर असे मयत महिलेचे नाव आहे. म्हस्के या पहाटे शिवराई रस्त्यावर पायी फिरत होत्या. त्यावेळी दुचाकीने (एम एच २० जी यु ०७९३) त्यांना धडक दिल्याने त्या गंभीर जखमी झाल्या.त्यांचेवर वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.मात्र उपचारा दरम्यान सकाळी ११ वाजता त्यांचे निधन झाले.या प्रकरणी रवि गोरख शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दुचाकी चालका विरूद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक आर आर जाधव हे करीत आहेत. म्हस्के यांच्या पश्चात पती ,मुलगी,भाऊ असा परिवार आहे.

## जिल्हास्तरीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापुर** : गंगापूर येथील न्यू हायस्कूल व श्री मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २० सप्टेंबर रविवार रोजी क्रीडा व युवक सेवा संचलनालय पुणे जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हास्तरीय १४,१७, व १९ वयोगटातील मुला मुलींच्या हँडबॉल स्पर्धा मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर यांच्या प्रांगणामध्ये उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेसाठी जिल्हाभरातून ३० पेक्षा अधिक संघांनी सहभाग नोंदवला या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून गंगापूर उपविभागीय पोलीस अधिकारी जानवी शेखर या उपस्थित होत्या त्यांनी बोलताना खेळ हा आपल्या जीवनातला किती महत्त्वाचा घटक आहे हे पटवून दिले खेळातूनच आपले भविष्य घडत असते खेळाच्या चिकाटीमुळे आपण आपल्या आयुष्याची यशस्वी वाटचाल करतो असं प्रतिपादन त्यांनी केलं यावेळी कार्यक्रमासाठी स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे सचिव तसेच जिल्हा हँडबॉल व हॉलीबॉल संघटनेचे डॉ.आबासाहेब शिरसाठ, तालुका क्रीडा अधिकारी रेखा परदेशी,रमेश सोनवणे,प्रा. फेरोज सय्यद,तालुका समन्वयक निलेश माने , छावाचे उद्धव काळे, जिल्हा हॉलीबॉल संघटनेचे प्रा उदय तगरे,अमिन पटेल,रामदास सारसर, प्रमोद महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.



स्पर्धा यशस्वी करण्यासाठी,प्रवीण पुलाटे,अंबादास उंडरे, महमूद पठाण,अब्दुल बागेस,अली बकोदा,प्रवीण बर्फे, मुकतार शेख, जुनेद शेख,शैलेश सोनवणे,प्रसाद सूर्यवंशी, जुबेर बागवान,अक्षय जोशी,श्रीकांत शिंदे आदीनी परिश्रम.

## विखे भगिनींची कोल्हारमध्ये गणरायाला सदिच्छा भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : कोल्हार बेलापूर रोड लगत असलेल्या छत्रपती शिवाजीनगर मधील छत्रपती शिवाजी महाराज मित्र मंडळाला माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील व सौ. सुवर्णाताई विखे पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन



गणपतीचे दर्शन घेतले तसेच पत्रकार प्रमोद कुंभकर्ण यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुंभकर्ण यांच्या घरी असलेल्या गौरी गणपतीचे देखील दर्शन घेतले. यावेळी सौ. अर्चना कुंभकर्ण यांनी सौ. शालिनीताई विखे पाटील व सुवर्णाताई राजेंद्र विखे पाटील यांचा सत्कार केला याप्रसंगी साईप्रसाद कुंभकर्ण सौ तेजश्री कुंभकर्ण गणेश कुंभकर्ण उपस्थित होते.

## निधन

### भानुदास चोरमले



**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील तिळापुर येथिल तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते भानुदास तुकाराम चोरमले यांचे वयाच्या ७० वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली व नातू असा परिवार आहे. त्यांचे सामाजिक व धार्मिक क्षेत्रात परिसरात मोठे योगदान होते. आश्वी येथिल पत्रकार सिताराम चांडे यांचे ते मामा तर डॉ. संजय चोरमले यांचे ते वडील होत.

### प्रयागाबाई जावळे



**चांदा** : येथील सौ. प्रयागाबाई सुदामराव जावळे यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात चांदा घोडेगाव रोड जावळे वस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. चांदा सोसायटीचे माजी अध्यक्ष सुदामराव जावळे यांच्या त्या पत्नी होत.

### शेख महमूद मोहम्मद



**श्रीरामपूर** : येथील खासदार गोविंदराव आदिक उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य शेख महमूद मोहम्मद उर्फ एम एम शेख सर (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. उर्दू हायस्कूलचे प्राचार्य म्हणून त्यांनी २७ वर्षे यशस्वीपणे धुरा सांभाळली. एक शिस्तप्रिय प्राचार्य म्हणून त्यांची ख्याती होती.त्यांच्या मागे पत्नी सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कमरुन्निसा शेख, मुलगा मोहसीन व तनवीर, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## घरभाड्याच्या वादातून दोन गटांत मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर**: तालुक्यातील संजयपूरवाडी येथे घर भाड्याने घेण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर दोन गटांतील मारहाणीत झाले. याप्रकरणी दोन्ही बाजूंनी वैजापूर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या असून, पोलिसांनी गुन्ह्यांची नोंद केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० सप्टेंबर रोजी सकाळी आठच्या सुमारास संजयपूरवाडी येथे ही घटना घडली. एका महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या शेजारी राहणाऱ्या इंदल नागलोड यांच्या पडलेल्या घराबाबत वाद सुरू होता. हे घर दुर्गापूजेसाठी भाड्याने घेण्याच्या कारणावरून सोमनाथ विठ्ठल मोहिते हा महिलेच्या घरासमोर आला. 'तू इंदलला फोन करून का सांगितले?' असे म्हणत त्याने शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून विनयभंग केला व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दरम्यान, सोमनाथ विठ्ठल मोहिते (३८) यांनीही पोलिसांत स्वतंत्र फिर्याद दाखल केली आहे. इंदलसिंग यांचे घर भाड्याने पाहण्यासाठी गेलो असता, तेथे एका महिलेने वाद घालून शिवीगाळ केली आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच महिलेच्या पतीसह इतरांनी लोखंडी दांड्याने डोक्यात मारून दुखापत केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे. जखमी मोहिते यांना पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविले. दोन्ही बाजूंच्या फिर्यादीवरून वैजापूर पोलिसांनी गुन्ह्यांची नोंद केली असून, पुढील तपास सुरू आहे.

## डॉ. निखिल उगले यांना जलतरण स्पर्धेत कास्य पदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : दि. २० सप्टेंबर रोजी श्रीरामपूर सायकलिंग क्लब आयोजित व आय एम ए श्रीरामपूर यांच्या साथीने. जलतरण स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये डॉ. निखिल उगले यांना वयोगट ३६ ते ४० यामध्ये ५० मीटर फ्रीस्टाइल मध्ये कास्यपदक मिळाले. डॉ. निखिल उगले यांचा स्पर्धा विजयाबद्दल सत्कार डॉ. सोमानी यांच्या हस्ते करण्यात आला. स्पर्धा श्रीरामपूर येथे ज्ञान साई हेल्थ क्लब येथे पार पडल्या.

या स्पर्धेसाठी त्यांना त्यांचे आजोबा डॉ. रामनाथ उगले, आई सिंधू उगले , पत्नी



तन्वी उगले,चुलते दिलीप उगले, सासरे विठ्ठलराव गुंजाळ, मामा कारभारी कान्हे, युवा परिवर्तन पॅनल पाचेगाव व तसेच सर्व ग्रामस्थ पाचेगाव यांचे सहकार्य लाभले. त्यांच्या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसुलीची चौकशी करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : ग येथील श्री मुक्तानंद महाविद्यालयात शिष्यवृत्ती सुरू असतानाही मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क सक्तीने वसूल केले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते बाबा भिवसने यांनी केला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी आमदार प्रशांत बंब यांच्याकडे निवेदनाद्वरे केली आहे.

गंगापूर तालुक्यात पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्काची सक्तीने वसुली करणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळत असतानाही त्यांच्याकडून शैक्षणिक परीक्षा शुल्क वसूल केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून चार ते पाच हजार रुपये, तर मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून १ हजार ७८० रुपये परीक्षा शुल्क घेतले जात असल्याचे म्हटले आहे. इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडूनही शुल्क आकारले जात असल्याचा आरोप आहे. याप्रकरणी महाविद्यालयाची चौकशी करून विद्यार्थ्यांकडून घेतलेले शुल्क नियमांनुसार आहे की नाही, याची तपासणी करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी बाबा भिवसने यांनी केली आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६

### मिलनम डे

उदय–अस्त सिंगल ५–१–९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १८० २३४ २२५ | ४ | १४९ २४८ २०० | १ | १२८ २९० १५५ |

९३–०९–४२–५४–१७–२१

### कल्याण

उदय–अस्त सिंगल ९–४–५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १२० २३८ ३५५ | ८ | १८९ २६० २३३ | २ | १२९ ३४६ २५५ |

३७–१३–८९–५८–२०–६२

### मुंबैम (मेन)

उदय–अस्त सिंगल ४–७–९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १४० २५८ ३६६ | ६ | १२३ २४० ४६६ | ० | १४५ २३५ २९९ |

५४–१५–६२–३६–०९–२०

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |

# झाळा दुष्काळाच्या.... ग्रामीण अर्थव्यवस्था ठप्प!

## बाजरी जळाली... सोयाबीनची राख झाली ; चारा पिकेही करपली !

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाच्या पदरी यंदाही निराशाच आली आहे. पावसाने सुरुवातीपासूनच हुलकावणी दिल्याने नगर तालुक्यातील खरीप हंगाम अक्षरशः करपून गेला आहे. बाजरी जळाली... सोयाबीनची राख झाली तर चारा पिकेही पावसाअभावी करपली आहेत. शेतात पीक नाही आणि गोठ्यात जनावरांसाठी चारा-पाण्याची सोय नाही अशी विदारक परिस्थिती तालुक्यात निर्माण झाली आहे.

तालुक्यातील १९ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र अनेक गावांमध्ये टँकरचे पाणीही अपुरे पडत असल्याने वाढीव टँकरची मागणी होत आहे. त्यासाठी लवकरच प्रस्ताव दाखल होणार असून अन्य गावांतूनही टँकरची मागणी पुढे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाई आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

### 'जल' संकट होणार गडद !

नगर तालुक्यातील १९ गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला तरी अनेक गावांमध्ये टँकरचे पाणी अपुरे पडत आहे. वाढीव टँकरसाठी प्रस्ताव दाखल होणार असून अन्य गावांतूनही टँकरची मागणी पुढे येत आहे. त्यामुळे तालुक्यातील पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होत असल्याचे चित्र आहे.



खरीप हंगाम पावसाअभावी मोठ्या संकटात सापडला असून सुमारे ५० हजार हेक्टर क्षेत्रावरील खरीप वाया गेला आहे. उत्पादन हातातून गेल्याने शेतकऱ्यांसमोर कर्ज, कुटुंबाचा खर्च आणि पशुधन जगविण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. फळबागांनाही पाणी देणे बळीराजाच्या आवाक्याबाहेर जात आहे.

तालुक्यातील परिस्थिती पाहता अनेक ज्येष्ठ नागरिकांकडून १९७२ च्या दुष्काळापेक्षाही यंदाची परिस्थिती गंभीर आहे अशी भावना व्यक्त केली जात आहे. विहिरी, बोअरवेल, तलाव, बंधारे कोरडे ठाक पडलेले असून पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे. हंडाभर पाण्यासाठी महिला, वृद्ध आणि कुटुंबांना दूरवर जावे लागत असल्याचे चित्र अनेक गावांत दिसत आहे. पिकांबरोबरच सुमारे अडीच लाख पशुधन जगविण्याचे मोठे संकट पशुपालकांसमोर उभे राहिले आहे. चारा पिके करपल्याने हिरवा चारा मिळणे कठीण झाले आहे. पाण्याची टंचाई आणि चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असल्याने पशुपालकांच्या चिंतेत भर पडली आहे. दुष्काळाचा फटका केवळ शेतापर्यंत मर्यादित राहिलेला नाही. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने गावागावातील बाजारपेठांमध्येही शुकशुकाट जाणवत आहे. आर्थिक व्यवहार मंदावले असून शेतीवर अवलंबून असलेली संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थाच ठप्प होण्याच्या मार्गावर आहे.

### पाण्यासाठी वणवण ; पशुधन जगविण्याचे मोठे संकट...तालुका तहानेने व्याकूळ

### चारा नाही... पाणी नाही... पशुधन संकटात !

खरीप पिकांसोबतच चारा पिकेही करपल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. हिरवा चारा मिळणे कठीण झाले असून पाण्याचीही टंचाई जाणवत आहे. शेतकरी स्वतःच्या संसारासोबत पशुधन कसे वाचवायचे या विवंचनेत सापडला आहे.

# बोधेगाव-बालमटाकळी परिसरात अवैध वृक्षतोड; रात्रीच्या वेळी लाकडाची वाहतूक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव, बालमटाकळी आणि परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. शेतशिवार, रस्त्यांच्या कडेला तसेच गावालगतच्या परिसरातील अनेक वर्षे जतन केलेली मोठी झाडे दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळी तोडली जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तोडलेल्या लाकडाची दिवस-रात्र वाहतूक सुरू असून, प्रशासनाच्या निदर्शनास आणूनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

तोडण्यात आलेले लाकूड ट्रॅक्टर, टेम्पो तसेच मालवाहू वाहनांमधून परिसरातील वखारींमध्ये जमा केले जाते. त्यानंतर हे लाकूड रात्रीच्या वेळी मराठवाड्यातील बीड, गेवराई तसेच कल्याण-मुंबई, तसेच शेवगाव मधील गेवराई रोड परिसरातही लाकडाच्या अवैध मिलवर हे येत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वाहतूक करण्यात येणाऱ्या लाकडाला आवश्यक ओळख चिन्हे किंवा टॅगिंग नसल्याचे, तसेच वाहन चालकांकडे लाकूड वाहतुकी संदर्भातील आवश्यक कागदपत्रे व पावत्या नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच रात्रीचे वेळी वृक्षतोड व लाकडांची वाहतूक पूर्णपणे बंद आहे हा वन खात्याचा नियमही लाकूड माफीया यांनी धाब्यावर बसवला आहे.

लाकूड कोठून आले आणि ते नेमके कोठे पाठविले जात आहे, याबाबत वन विभागाकडून आवश्यक अधिकृत परवाने व अनुमती तपासली जात नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी कोणत्याही अडथळ्याविना लाकूड वाहतूक सुरू असल्याचे नागरिक सांगतात.

या प्रकरणात वन विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आर्थिक हितसंबंधांमुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची चर्चा स्थानिक नागरिकांमध्ये असल्याचे सांगण्यात येते. मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दरम्यान, परिसरातील लाकूड गिरण्यांच्या परवान्यांचे नूतनीकरण झाले आहे की नाही, याची तातडीने तपासणी करावी. तसेच आडवा आरा व उभा आरा चालविण्यासाठी संबंधितांना कोणत्या स्वरूपाच्या परवानग्या देण्यात आल्या आहेत, याबाबत वन विभागाने स्पष्ट माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अवैध वृक्षतोडीमुळे परिसरातील हिरवळ कमी होण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल आणि पक्षी व वन्यजीवांच्या अधिवासावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन अवैध वृक्षतोड तसेच लाकूड वाहतुकीची सखोल चौकशी करावी आणि नियमबाह्य प्रकार आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. कारवाई न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# श्री विशाल गणेश मंदिराचा परिसर महिलांच्या सामुहिक अथर्वशिर्ष पठाणाने दुमदुमला



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त सामुहिक अथर्वशिर्ष पठण व महाआरती करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर विणा दिघे, अमृता बेडेकर,गायत्री मिसाळ, अश्विनी वाडेकर ,कविता अनमल, माधवी ऋषी, श्रेया कुलकर्णी, स्नेहा जोशी, अपर्णा बालटे आदिंनी अथर्वशिर्ष पठणास प्रारंभ केला. यावेळी रेखा झंवर, आशा पुंड जोती नराल, मंदाकिनी सोनवणे, अश्विनी डोंगरे ,सुरेखा मणियार आदिं महिलांनी शंख नाद केला.

या अथर्वशीर्ष साठी प्रसादासाठी मच्छिंद्र चोधरी ,सुधीर सूळ ,बाळासाहेब व्यापारी ,गणेश पालवे ,राजेश एकाडे, राजु जग्गी,वैभव जगताप ,किशोर सुडके ,वैभव दरेकर ,सतीश पठारे ,प्रदीप झोडगे ,संदीप बेरड ,राहुल धोकरिया ,गिरीश पप्पाल ,चंद्रकांत फुलारी ,गणेश आंबेकर ,मिलिंद कानडे ,संदीप फुलसुंदर ,विनायक कानडे ,महेश दांगडे, प्रणित अनमल ,नितीन पुंड आदिंनी केले. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबीरे, रंगनाथ फुलसौंदर,चंद्रकांत फुलारी , ज्ञानेश्वर रासकर ,बापूसाहेब एकाडे प्रा माणिकराव विधाते संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह पुजारी संगमनाथ महाराज उपस्थित होते.

# गोळेगाव तलावाची भिंत उंचावल्यास शेवगाव तालुक्यातील ४० गावांना जलसंजीवनी!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गोळेगाव तलावाची भिंत उंचावल्यास तालुक्याच्या पूर्व भागातील३५ ते ४० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे त्याचबरोबर परिसरातील गोळेगाव सह नागलवाडी दिवटे अधोडी लाड जळगाव शेकटे मुरमी अशा आठ ते दहा गावातील हजारो हेक्टर शेतीला सिंचनाचा मोठा. लाभ मिळणार असल्याने गोळेगाव तलावाकडे संभाव्य 'जलसंजीवनी प्रकल्प' म्हणून पाहून शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांतून जोर धरू लागली आहे.



गर्भगिरीच्या डोंगररांगांमधून पावसाळ्यात वाहणारे जलप्रवाह गोळेगाव तलावात एकत्र येतात. दोन्ही बाजूंच्या डोंगररांगा आणि या परिसराचा नैसर्गिक उतार पाहता येथे मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण करण्याची भौगोलिक क्षमता असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. सध्या तलावातील पाण्याचा साठा मर्यादित असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वाहून जाणारे पाणी पूर्ण क्षमतेने अडविणे शक्य होत नाही त्यामुळे

गोळेगाव तलावाच्या भिंतीची उंची वाढवून त्याचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन केल्यास मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक करता येऊ शकते. यासाठी जलसंपदा विभागाने प्रत्यक्ष तांत्रिक सर्वेक्षण करून उपलब्ध जलप्रवाह, पाणलोट क्षेत्र, धरणाची सुरक्षितता आणि संभाव्य साठवण क्षमता यांचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे असल्याची मागणी परिसरातील गावोगावच्या शेतकऱ्यातून होत आहे पावसाळ्यात परिसरातील नदी-नाल्यांना पूर आल्यावर मोठ्या प्रमाणात पाणी गोदावरीच्या दिशेने वाहून जाते. हे पाणी योग्य पद्धतीने अडवून साठविल्यास पावसाचे वाहून जाणारे पाणी शेती आणि पिण्याच्या पाण्यासाठी उपयोगात आणता येईल असेही या परिसरातील शेतकरी नागरिकांचे म्हणणे आहे त्यामुळे.

भूजल पुनर्भरणाला मिळणारी चालना लक्षात घेऊन गोळेगाव तलावाची भिंत वाढविण्याची मागणी तातडीने मंजूर करून सत्वर कार्यवाहीची मागणी परिसरातील गावोगावच्या शेतकरी नागरिकातून होत आहे. उन्हाळ्यात परिसरातील अनेक विहिरी आणि बोअरवेलची पाणीपातळी मोठ्या प्रमाणात खालावते. तलावाची भिंत उंचावून आवश्यक त्या ठिकाणी नियंत्रण दरवाजे बसविल्यास टंचाईच्या काळात नियोजनबद्ध पद्धतीने नदीपात्रात पाणी सोडता येऊ शकते.

# राज्याच्या ग्रामविकासात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे महत्वपूर्ण योगदान : भंडारी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सभासदांना केवळ कर्ज न देता त्यांच्या अडी-अडचणीत साथ देण्याची भूमिका ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था सातत्याने घेत असते. सभासदांच्या कुटुंबाला संकट काळात आधार दिला जातो. हक्काच्या घराचे स्वप्न साकार करणे, कुटुंबाचे आरोग्य, मुलांचे शिक्षण, गाडी खरेदी अशा सर्वच कामांसाठी पतसंस्था आपल्याला मदत करेल हा विश्वास सभासदांना असतो. पतसंस्थेचे हे काम कौतुकास्पद आहे. सगळेजण अतिशय आव्हानात्मक परिस्थितीत काम करत असतात. त्यामुळे बरेचदा आपले कुटुंबाकडे दुर्लक्ष होते. महाराष्ट्रात ग्राम विकासात जी प्रगती झाली आहे, त्यात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. याप्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन संदीप लगड, रुबाब पटेल, नारायण खेडकर, सतीश मोटे, सुनील नागरे, रामदास गोरे,दिलीप नागरगोजे, सुनिल वाघ,शामराव भोसले, मंगेश पुंड, वाळिबा मुंढे, उद्धव जाधोर, भगवान खेडकर, किसन भिंगारदे, सुरेश मंडलिक, भाऊसाहेब गायकवाड, अशोक खळेकर, सविता भाकरे, राणी फाटके, मधुकर जाधव, लक्ष्मण नागरे, युवराज पाटील, अशोक नरसाळे, राजेंद्र पावसे, रवींद्र ताजने, संजय घुगे, राम कार्ले, शहाजी नरसाळे, शितल पेरने, बापूसाहेब राजळे, कृष्णा बडे, महेश जंगम, भैय्यासाहेब कोठुळे, योगिता गिरवले, आसाराम कपिले, संपत गोल्हार, विशाल काळे, सर्व तालुकाध्यक्ष, तालुका सचिव, प्रदीप कल्याणकर, नफीस खान पठाण आदीसह संघटना पदाधिकारी, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जरांगेची सरसी; जिंकणे लांबणीवर राज्य सरकारची मात्र झाली फरपट

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेली वीस दिवस उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांनी अंतरवली सराटी येथून मुंबईच्या दिशेने कूच केली. पोलिसांनी परवानगी नाकारुनही त्यांचा मुंबईत उपोषणाचा निर्धार कायम होता. बीड जिल्ह्यातील पाटोदापर्यंत पोहोचले होते. त्यांच्या उपोषणाला राज्यभरातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पोलिसांच्या गोपनीय अहवाल सरकारला झाले असणार परिणामी राज्य शासनाने चचे चे दरवाजे जे बंद करण्याची वल्गना केली होती, त्याला मुरड घालून मंत्री राधाकृष्या विखे यांच्या नेतृत्वाखालील शिएमद्वाराने धाय घेतली. पाटोद्यात जगे यांच्याशी आरक्षणाच्या मागण्याबाबत चर्चा वारत त्या तत्वतः मान्य करण्याच्या संदर्भात आश्वासित केले. सरकार दोन पाऊल मागे सरकले तोच पवित्रा जरांगेनी घेत तूर्तातूर्त तीन महिन्यासाठी उपोषण स्थनित ठेऊन आंदोलन सुरु ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला, तसा हा आरक्षण सामना 'डॉ' झाला जरांगेंची सरसी झाली असली तरी तहाच्या बोलणीमुळे जिकरी लांबणीवर पहले, पण निमित्ताने सरकारची मात्र फरफट झाली. हा तिद्रा इतक्या सहजासहजी सुटणारा नसल्याने सस्कारची त्रेधातिरपीट होणार, असाच रागरंग दिसतो सरकार गुडघ्यावर राज्य सरकारच्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांनी यापुढे जरांगे यांच्याशी चचर्चा नाही, अशी कल्पना मोठ्या अर्थिभावात केली होती. एवढेच काय मंत्रिमंडव्याच्या बैठकीत अनेक मंत्र्यांनी जरांगे यांच्या भाषेला आक्षेप घेऊन उघड नाराजी प्रदर्शित केली होती. त्यांची भाषा महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभावक नाही, असे मंत्री असे मंत्री भुजबळ यांनी ठासून सांगितले. तरीसुद्धा सरकार चर्चेसाठी दुरुप्यावर का आले? याचे उत्तर गणेश उत्सव आणि मराठवाडा मुलीसंग्राम दिनाच्या कार्यक्रमात दहलेले दिसते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थित्तीत छत्रपती संभालीनगरमध्ये हा समारंभ होता, त्याला मराठा आंदोलकांनी गालबोट लावणे सरकारच्या प्रलिकेला परवडमाले नहाते. त्यामुळेच सरकारी शिश्मंडळ आदल्या दिवशीच पाटोद्यात पोहोचले आणि त्यांनी तडजोडीचा मसुदा जरींकडे मान्य करण आजचे मरण उद्यावर उकलले. त्यातही जांगे जर मुंबईपर्यंत पोहोचले तर गणेशोत्सवात अभूतपूर्व स्थिती निर्माण होऊ शकते, असे गोपनीय रिपोर्ट सरकारला पान झाले असणार, त्यात जरांगे आंदोलन प्रकरणी कोटीने आदेश करणे टाळले होते. पोलिसांचा अहवाल आले. अनुकूल नसणार, परिणामी सरकार गुठप्यावर आश्वासनांचा तिढा जरांगे यांनी उपोषण स्थगित करण्यासाठी पाच मागण्यांची हमी घेतली. त्यात १) ५८ लाख गोंदीतून रवही गोंद कमी होऊ गये, २) हैद्राबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रासाठी सुधारित शासननिर्भय लावावा, ३) सातारा, औध पुगे, कोल्हापूर गॅझेट लागू करा, ४) हैद्राबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्रांना वैधताहावी, प्रपत्र रद्द करु नये, ५) मराठवाड्यातील जणांची जी प्रमाणपत्र रद्द केलीत, ती वैध ठरवण्यात यावीत. वास्तविक सरकारची गोची नेमकी याच मुहावर होणार आहे. लोकप्रतिनिधींची जी प्रमाणपत्र रद्द झाली, ती वैध करण्याची आता नेमकी कायदेशिर प्रक्रिया कोणती अवलंबगर आणि ती कोटीत टिकार कर. हाच खरा कळीचा तिढा असून, त्यात सरकारमा वास लागणार आहे. सरयवर त्यात मुख्यमंत्री फडणवीस मोठ्या राणाभीमदेवी थाटात सांगत होते की, १३ पैकी होते की, १३ पैकी १२ मातम्या यापूर्वीच मान्य केल्या आहेत. आता नव्याने 'जी आर काढावा लागणार म्हणजे सरकारचा दावा केला होता, यावर शिक्कामोर्तब होते. जरारे है करातेले मुत्पाद्दी आहेत, त्यांनी आतापर्यंत ९६ दिवसांचे उपोषण केलेले केलेले आहे. सरकारला को खिंडीत गाठून मागण्या मंजूर करायच्या, है बनसब त्यांनी साध्य केले आहे. हा गडी अशिक्षित असून त्याचा आरक्षणाचा अभ्यास नाही, ही मंत्री छगन भुजबळ आणि 'हाके'ला चपराक आहे. जे मते करू शकले नाही, ते जरांने साध्य करतात म्हणून त्यांनी उपोषण स्थगित करून ९० दिवसांची मुदत दिली. सरकार कदाचित फसवणूक कर सकते, हे गृहित धरल्याने नही गुलाल उधळून विजयोत्सव साजरा केला, तत्ता तो यावेळी त्यांनी केला नाही, ही सबुरी त्यांची राजवीयि खेळी आहे, हे विरोधकांनी लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रवादीला डावलले? राज्यात महायुतीचे सरकार आहे. कोणताही महत्वपूर्ण निर्णय भाजप, शिवसेना (शिंदेगट), राष्ट्रवादी (अजित पवार) है पक्ष एकत्रित घेतात. या मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर करून आश्वासन दिले, त्यात भाजप आणि हिंदे सेनेचे मंत्री आणि आमदार होते. त्यात राहवादी (अजित दादा) पक्षाचे प्रतिनिधी कोशीच नव्हते, मर त्यांना बाजूला ठेवले का, त्यांना डावलण्याचे प्रयोजन शंका निर्माण करणारे ठरु शकते मराठा मुख्यमंत्र्यांवर आक्षेप का? माजी मुख्यंत्री शिंदे यांचा अपवाद वगळता आतापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांनी मराठा असताना आरक्षत्र का दिले दिले नव्हते. जे काही दिले ते तर मुख्यमंत्री फडणवीस यांनीच, अला भाजपचा मुक्तिवाद आहे, त्यात ते प्रामुख्याने शरद पवार वांचेच नाव घेतात. मंत्री चंद्रकांत पाटील उघड प्रतिक्रिया देतात. ओबीसी आरक्षण शरद पवारांनी दिले, त्यावेळी मराठ्यांना का दिले नाही? असा त्यांचा सवाल आहे. सध्याची स्थिती पाहता त्या काळात आरक्षण का दिले नव्हते, याचे उत्तर आपोआप मिळते. मुख्यमंत्री हा कोगल्या जातीचा अधना पक्षाचा नसतो. तो राज्याचा प्रमुख असतो, त्यांना दुजाभाव करता येत नाही. फड़णधी आणि बापूर्वी मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले मग ते ब्राह्मणांच्या ब्राह्मगांच्या मागण्या पूर्ण का करु शवन्त नाही, वाचे उत्तर द्यावे. विखेंची गोची गणेशोत्सव असल्याने जरांगे यांनी मुंबईत येवू नये, असा पवित्रा सरकारचा होता, पण तो न पटणारा आहे. गणेशोत्सव लोकमान्य टिळकांनी सुरु केला. घरातला गरफ्ती रस्त्यावर सार्वजनिक केला, तो जनजागृती आणि प्रबोधनासाठी केवळ हिंदुत्वाच्या प्रचाराकरिता नव्हे, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव असतो, मा जरांगगा मुंबईला आंदोलन करण्यास मजाय का करण्यात येत होता. हा हिजे आणि नाचगाण्याचा, मनोरंजनासाठीचा सग नाही. जागृती आणि प्रबोधनासाठी आंदोलन झाले तर कायदा आणि असते, ती राज्याचे गृहखाते टाळत होते. म्हणूनच सरकारला जरंगे मुंबईत मुंबईत येणे परवडणारे नव्हते. त्यासाठी त्यांनी मंत्री विखे यांना वेळोवेजी पुढे केले, पण त्यांनी हात टेवले आणि चर्चा बंद, अत्सा पवित्रा घेतला, पण शेवटी त्यांना चर्चा करण्याची नामुष्भरि पती गाली, ही त्यांत मोती पिछेहाट आहे, हे मुख्यमंत्र्यांना माहित होते, म्हणून मंत्री चंद्रकांत पाटील ऐवजी मंत्री विखेंना तोफेच्या तोडी दिले, हाव याचा अन्यायार्थ

– रामदास ढमाले (ज्येष्ठ पत्रकार)



# रोटरी क्लबचे कार्य प्रेरणादायी : काकडे

**अमरापुर :** रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या माध्यमातून राबविण्यात येणारे समाजोपयोगी उपक्रम प्रेरणादायी असून, गरजू विद्यार्थिनींना सायकली उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्या शिक्षणातील अडचणी दूर होऊन शिक्षणाची वाट अधिक सुकर होईल, असे प्रतिपादन अमरावतीचे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी केले. यावेळी मनीषा लबडे-दहातोंडे यांनी मनोगत व्यक्त केले. सायकल वाटप उपक्रमासाठी प्रांजल मधुकर देवणे, हरिभाऊ बोडखे, मंगल लबडे-गोरे, मनीषा लबडे-दहातोंडे व उज्वल धूत यांनी योगदान दिले. कार्यक्रमास बाळासाहेब भारदे हायस्कूलचे मुख्याध्यापक उमेश घेवरीकर, भागनाथ काटे, डॉ. मुकुंद दारकुंडे, वसंतराव सुरवसे, प्रा. राम नेव्हल, ज्येष्ठ नागरिक फिरस्ता संघ व गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, खजिनदार अशोक लबडे, डॉ. काकासाहेब लांडे, प्रवीण लाहोटी, वसीम सर, प्रा. किसनराव माने, स्नेहलता लबडे, डॉ. आशिष लाहोटी,, डॉ. दिनेश राठी, कैलास कचरे, मनीष बाहेती, राजीव रसाळ, राधेश्याम तिवारी, विष्णू आधाट यांच्यासह विद्यार्थी, पालक तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# पाथर्डीच्या दोन्ही बसस्थानक सुधारणांसाठी प्रतिसाद द्यावा

## नगराध्यक्ष अभय आव्हाड यांची मागणी

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** आ. मोनिका राजळे यांच्या माध्यमातून पाथर्डी एसटी आगाराला सर्वतोपरी सहकार्य आहे. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील दोन्ही बस स्थानकांच्या सुशोभीकरण व नूतनीकरण करण्याच्या प्रस्तावाला तातडीने मान्यता द्यावी. आमदार राजळे यांचे त्वरित प्रतिसाद मिळेल अशी माहिती नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली.

पाथर्डी आगाराला महायुती सरकारच्या धोरणानुसार पाच पाच नवीन जिजाऊ बसेस मिळाल्या. या सर्व गाड्यांचे पूजन समारंभ पूर्वक करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, आगारप्रमुख अमित बनसोडे, भाजप महिला आघाडीच्या ज्योति शर्मा, माजी सभापती विष्णुपंत अकोलकर, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, भाजपचे तालुकाध्यक्ष धनंजय बडे, बंडू शेठ बोरुडे, सुभाष बोरुडे, अमोल गर्जे पाटील, वाहतूक निरीक्षक गोवर्धन दहिफळे, बाळासाहेब सोनटक्के, जहीर शेख, एसटी बँकेचे संचालक दत्ता खेडकर, सुनील कर्नावट, दिगंबर आव्हाड, आदींसह प्रवासी संघटनेचे पदाधिकारी सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आव्हाड म्हणाले, आमदारांच्या प्रयत्नामुळे नव्या बस गाड्या मिळत आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांनी लांब पल्ल्याच्या गाड्यांवर लक्ष केंद्रित करावे. नव्या गाड्यांमुळे आगाराचे रूपही आता पालटत असून नगरसाठी असलेली गाड्यांची अडचण प्रामुख्याने दूर झाले आहे. पाथर्डीच्या जुन्या बसस्थानकाची अवस्था अतिशय दयनीय झाली असून आमदार राजळे यांनी याबाबत स्थानिक अधिकाऱ्यांपासून मध्यवर्ती कार्यालयातील अधिकाऱ्यांपर्यंत वेळोवेळी संपर्क साधून चर्चा केली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक क यांच्या निदर्शनास स्थानिक समस्या आणून दिल्या. मात्र एसटीच्या व्यवस्थापनाकडून फारसा प्रतिसाद मिळत नाही. शहरातील दोन्ही बस स्थानके मोठ्या प्रमाणावर वाहतूकचे असून कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील पाथर्डी मार्गे जाणारे गाड्यांची संख्या वाढल्याने सुस्थितीतील बस स्थानके अत्यावश्यक आहेत. पालिकेकडूनही यासाठी पूर्णपणे सहकार्य देण्यात आले आहे. लवकरच आणखी पाच गाड्या आगाराला मिळणार असून पंढरपूर सारख्या तीर्थक्षेत्रासाठी



स्थानिक प्रवाशांची मागणी लक्षात घेता कायमस्वरूपी बस उपलब्ध करून देण्यात यावी. अक्कलकोट बसला प्रवाशांचा प्रतिसाद पाहता स्थानिक अधिकाऱ्यां सह विभाग नियंत्रकांचेही अभिनंदन आमदार मोनिका राजळे यांच्यावतीने करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब सोनटक्के तर आभार आगर प्रमुख अमित बनसोडे यांनी मानले.

प्रवासी संघटनेच्या वतीने संतोष जिरेसाळ यांनी महामंडळाचे विशेषतः विभाग नियंत्रकांचे आभार मानत लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्याची मागणी केली.

# महावितरणमध्ये बघतो, करतो'चे दिवस संपले; आता रिझल्ट पाहिजे: दिनेश अग्रवाल

## १० दिवसांत ६८२ कोटी रुपयांच्या वसुलीचे उद्दिष्ट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** काळ बदलला आहे. 'बघतो', 'करतो', 'पुढच्या महिन्यात होईल' अशी उत्तरे आता चालणार नाहीत. यापुढे काम ाचा रिझल्ट अपेक्षित आहे. उद्दिष्टपूर्ती झाली नाही तर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा महावितरणचे कार्यकारी संचालक (वाणिज्य) दिनेश अग्रवाल यांनी पुणे परिमंडलातील अधिकाऱ्यांना दिला. सप्टेंबरअखेरपर्यंत चालू वीजबिलासोबत अतिरिक्त ६८२ कोटी रुपये थकबाकीतून वसूल करण्याचे उद्दिष्ट त्यांनी दिले आहे.

महावितरणने पुणे व बारामती परिमंडलाचे पालकत्व कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल यांच्याकडे सोपविले आहे. पालक संचालक म्हणून अग्रवाल यांनी शनिवारी (दि. १९) रास्तापेठ येथील पॉवर हाऊस येथे पुणे परिमंडलातील वसुली, वीज गळती आणि कामगिरीचा आढावा घेतला. या बैठकीला प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर, अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, सहायक म हाव्यवस्थापक (वि.व ले.) सौ. कीर्ती भोसले यांच्यासह पुणे परिमंडलातील सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते व अधिकारी उपस्थित होते.अग्रवाल म्हणाले, आपला स्वतःचा व्यवसाय पुढे नेण्यासाठी ज्या तळमळीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने आपण प्रयत्न करतो, त्याच भावनेने महावितरणच्या उत्कर्षासाठी काम करा. शंभर टक्के वसुलीसोबतच वीज गळती कमी करण्यासाठी ठोस ॲक्शन प्लॅन तयार करा. त्यानुसार कामाचे नियोजन करून निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करा.

सप्टेंबर महिन्याच्या चालू देयकासह पुणे परिमंडलाने १,२५४ कोटी रुपयांची वसुली करणे अपेक्षित होते. मात्र, आतापर्यंत ५७१ कोटी रुपयांची वसुली झाली असून अद्याप ६८२ कोटी रुपये वसूल करणे बाकी आहे. ही संपूर्ण रक्कम पुढील १० दिवसांत वसूल करण्याच्या स्पष्ट सूचना अग्रवाल यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिल्या.

वसुलीसोबतच वीजचोरांविरोधातील मोहीम आणखी तीव्र करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. ग्राहकसेवा, वीजपुरवठ्याची गुणवत्ता, वसुली आणि वीज गळती कमी करण्याच्या कामात ठोस परिणाम दिसला पाहिजे. केवळ नियोजन न करता त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि त्यातून अपेक्षित परिणाम साध्य झाले पाहिजेत, असे अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

## महावितरणचे आज 'ग्राहक समाधान शिबिर'

### २१ सप्टेंबरला सर्व ५२ उपविभागीय कार्यालयांत आयोजन; तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यावर भर

**पुणे :** वीज ग्राहकांच्या समस्या व तक्रारींचे स्थानिक पातळीवर तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणच्या पुणे परिमंडलात दुसरे 'ग्राहक समाधान शिबिर' सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. पुणे परिमंडलातील सर्व ५२ उपविभागीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हे शिबिर होणार आहे. ग्राहकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या वीजविषयक समस्या व तक्रारी मांडाव्यात, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

पुणे परिमंडलात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी 'ग्राहक सम ाधान शिबिर' आयोजित करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या शिबिरामध्ये वीजबिल, वीजपुरवठा, मीटर, वीजजोडणी तसेच म हावितरणच्या विविध सेवा व योजनांशी संबंधित तक्रारी थेट संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसमोर मांडण्याची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.मागील शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. पहिल्या शिबिरात पुणे परिमंडलातील विविध ठिकाणी १,२९३ ग्राहकांनी सहभाग घेतला होता. एकूण ७४४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ६८४ अर्जांचा निपटारा शिबिरात करण्यात आला होता. उर्वरित प्रलंबित अर्जांवरही कार्यवाही पूर्ण करून सर्व तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.ग्राहकांनी आपल्या वीजबिल, मीटर, वीजपुरवठा, वीजजोडणी किंवा अन्य वीजविषयक तक्रारींसह शिबिरात सहभागी व्हावे आणि उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

## महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे रूजू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



अंकुर कावळे संदीप पाटील चंद्रमणी मिश्रा सुनील काकडे

**पुणे :** महावितरणच्या प्रादेशिक संचालक / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिशा व सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.

कार्यकारी संचालक अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून श्री. कावळे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते.

कार्यकारी संचालक. चंद्रमणी मिशा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ म ध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. श्री. मि शा कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. कार्यकारी संचालक सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. श्री. काकडे यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून श्री काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.



## वळती–नागापूरदरम्यान वीजपंपांच्या केबल चोरीचा धुमाकूळ; शेतकरी हवालदिल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील वळती–नागापूर गावांदरम्यान मीना नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या पाणीसाठ्यात शेतीसाठी बसविण्यात आलेल्या वीजपंपांच्या केबल अज्ञात चोरट्यांनी कापून त्यातील तांब्याच्या तारा लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या परिसरात वारंवार केबल चोरीच्या घटना घडत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

वळती–नागापूरदरम्यान मीना नदीवर कोल्हापूर पद्धतीचा बंधारा आहे. या बंधाऱ्याच्या पाणीसाठ्यात वळतीसह नागापूर, गाढवेवस्ती आणि काटवणवस्ती परिसरातील शेतकऱ्यांनी शेतीच्या पाण्यासाठी वीजपंप बसविले आहेत. परिसर निर्जन असल्याने रात्रीच्या वेळी चोरट्यांकडून वीजपंपांच्या केबलला लक्ष्य केले जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.दोन दिवसांपूर्वी चोरट्यांनी काही शेतकऱ्यांच्या वीजपंपांच्या केबल कापून त्यातील तांब्याच्या तारा काढून नेल्या. त्यानंतर सुमारे ५० मीटर अंतरावर पुन्हा केबलमधील तांब्याच्या तारा चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या परिसरात केबल चोरी करणारी टोळी सक्रिय असल्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

यापूर्वी शेजारील रांजणी गावातील खडकवाडी परिसरातील नरसिंह बंधाऱ्यातही अनेक शेतकऱ्यांच्या वीजपंपांच्या केबल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या होत्या. त्यामुळे वळती–नागापूरसह लगतच्या परिसरातही अशा चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांनी या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांनी परिसरात गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

## बालपण हरवलं, मोबाईल जिंकला!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** गौरी–गणपती उत्सवानिमित्त बारामती तालुक्यातील करंजेपूल–गायकवाड वस्ती येथील घोलप कुटुंबीयांनी 'बालपण हरवलं आणि मोबाईल जिंकला' या विषयावर समाजप्रबोधन करणारा आकर्षक देखावा सादर केला. मोबाईलचा वाढता वापर, त्याचा गैरवापर आणि त्यामुळे मुलांचे हरवत चाललेले बालपण यावर या देखाव्यातून प्रभावी भाष्य करण्यात आले.

पूर्वी मुलांचे बालपण लगोरी, गोट्या, विटीदांडू यांसारखे पारंपरिक खेळ तसेच विविध मैदानी खेळांनी बहरलेले होते. मित्र–मैत्रिणींसोबत खेळणे, धावणे आणि म ोकळ्या वातावरणात वेळ घालवणे यात मुलांचा आनंद सामावलेला होता. मात्र, मोबाईल, इंटरनेट आणि समाजमाध्यमांच्या वाढत्या वापरामुळे मुलांचा मोठा वेळ मोबाईलमध्ये जात असल्याचे चित्र या देखाव्यातून मांडण्यात आले.मोबाईल हा आधुनिक जीवनाचा महत्त्वाचा भाग असला तरी त्याचा योग्य आणि मर्यादित वापर आवश्यक आहे. मोबाईलच्या अतिरेकामुळे मुलांच्या शारीरिक हालचाली, मैदानी खेळ, अभ्यास आणि कुटुंबातील संवादावर परिणाम होऊ शकतो, असा संदेश देण्यात आला.



पूर्वी आजी–आजोबा मुलांना गोष्टी सांगत आणि त्यातून संस्कार व अनुभवांची शिदोरी मिळत असे. आज मात्र एकाच घरात किंवा शेजारी बसलेले असतानाही प्रत्येकजण आपापल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्याचे वास्तव देखाव्यातून मांडण्यात आले. काजल शुभम घोलप यांनी या सामाजिक विषयाची मांडणी केली.

> 'मोबाईलचा वापर करा, पण मोबाईलला आपल्या आयुष्याचा मालक बनवू नका', असा संदेश देत घोलप कुटुंबीयांनी गौरी–गणपती उत्सवाच्या माध्यमातून सम ाजप्रबोधनाचे कार्य केले तर दरवर्षी समाज उपयोगी असेच देखावे करणार.
> –सौ काजल शुभम घोलप

घोलप कुटुंबीय दरवर्षी विविध सामाजिक विषयांवर देखावे सादर करतात. त्यामुळे सोमेश्वर पंचक्रोशीतील महिलावर्ग गौरी–गणपती देखावा व हळदीकुंकू कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक करतो. यंदाचा देखावाही नागरिकांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला.

## साईडपट्ट्या नसल्याने खुटबाव– पिंपळगाव रस्ता बनला धोकादायक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत :** एमएसआयडीसी बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली खुटबाव ते पिंपळगाव सिमेंट रस्त्याचे काम करण्यात आले आहे. या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सुद्धा ठेकेदाराने या रस्त्याच्या साईडपट्ट्या भरलेल्या नाहीत. त्यामुळे या रस्त्यावर वारंवार अपघात घडत आहेत. या ठिकाणी रस्ता उंच असल्याने रात्रीच्यावेळी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही त्यामुळे रोज अपघात होत आहेत. या नव्यानेच झालेल्या रस्त्याच्या साइडपट्ट्यांचे काम रखडल्याने अपघातात वाढ झाली आहे. साइडपट्ट्या पूर्णपणे भरल्या नसल्याने दोन्ही बाजूंकडून येणाऱ्या वाहनांना अडथळा येत आहे.



पर्यायाने दोन वाहने एकाचवेळी बसत नसल्याने साइडपट्ट्यांची कामे करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. तसेच हा रस्ता निकृष्ट झाला असून याची चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. या रस्त्यावरून एकाच वेळी दोन वाहने आल्यास वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही, त्यामुळे वाहनचालकांची तारांबळ उडते आणि अपघाताला निमंत्रण मि ळत आहे. साईडपट्टी नसल्यामुळे वाहन खाली अथवा बाजूलाही घेता येत नाही. रात्रीच्या वेळी चारचाकी वाहने रस्त्यावरून सरळ खाली जात आहेत. या ठेकेदाराला काळ्या यादीत समाविष्ट करावे, अशी स्थानिक ग्रामस्थांनी मागणी केली आहे. यामध्ये अधिकारी व ठेकेदारांचे लागेबांधे असल्याचे चित्र दिसत आहे. रस्त्याचे काम होऊन तीन महिने झाले असले तरी हा रस्ता गैरसोयीचा ठरत आहे. अजूनही ठेकेदाराने या ठिकाणी साईडपट्ट्यांवर मुरुम टाकलेला नाही. परिणामी या ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या स्थानिक शेतकरी व नागरिकांनी शेतात जायचे कसे असा प्रश्न उपस्थित केला आहे.

## दखल

### पीएम सूर्य घर व 'स्मार्ट' योजनेची माहिती आता तालुका पातळीवर

पुणे : केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा सेतू कॅम्प'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)' योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष 'किओस्क' उभारणार आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल.

किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कर्जासाठीही अर्ज करता येईल. 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट' योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.नागरिकांनी महावितरणच्या या उपक्रमाचा आणि सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### कारेगावपर्यंतची पीएमपीएमएल बस शिरूरपर्यंत सुरू करा



**शिरूर :** वाघोलीहून कारेगावपर्यंत येणारी पीएमपीएमएल बस पुढे शिरूरपर्यंत दिवसभर सुरू करावी, अन्यथा पीएमपीएम एलच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा भाजप महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया लोकेश बिरादार यांनी दिला आहे.याबाबत त्यांनी सहव्यवस्थापकीय संचालक ॲलीस पोरे यांच्यामार्फत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांना निवेदन दिले आहे. शाळा व महाविद्यालये सुरू झाल्याने शिरूर परिसरातील पाषाणमळा, बोऱ्हाडे मळा, घावटे मळा, सरदवाडी, फलके मळा, करडे, आंबळे, कारेगाव, कोंढापुरी आणि कासारी फाटा येथून विद्यार्थी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्ण मोठ्या प्रमाणात शिरूर व पुण्याकडे ये–जा करतात.

पुणे–नगर मार्गावरील एसटी बस रांजणगाव व शिक्रापूर वगळता अनेक ठिकाणी थांबत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. सध्या कारेगाव–शिरूर आणि शिरूर–कारेगाव या मार्गावर सकाळ–संध्याकाळच्या मोजक्या फेऱ्या सुरू आहेत. त्याऐवजी वाघोलीहून कारेगावपर्यंत येणारी पीएमपीएमएल बस पुढे शिरूरपर्यंत दिवसभर सुरू केल्यास प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होईल. तसेच पीएमपीएमएलला या सेवेतून उत्पन्नही मिळू शकते, असे निवेदनात नमूद केले आहे.कारेगावपर्यंत धावणारी पीएमपीएमएल बस चार्जिंगच्या कारणामुळे शिरूरपर्यंत आणणे शक्य नसल्यास डिझेल किंवा सीएनजी बस उपलब्ध करून ही सेवा तातडीने सुरू करावी. अन्यथा कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

### गोळीबार करून हत्या; तिघांना ४८ तासांत अटक



शिरूर : शिरूर शहरातील लाटेआळी, आंबेडकरनगर परिसरात जुन्या वादातून तरुणावर गोळीबार करून हत्या केल्याच्या प्रकरणातील तीन आरोपींना शिरूर पोलिसांच्या डी.बी. पथकाने ४८ तासांत अटक केली. सुपा टोलनाका परिसरात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली.

१८ सप्टेंबर रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास तौफिक अन्सारी यांच्या घरासमोरील रस्त्यावर पैशांच्या वादातून हरिष गंगावणे यांच्यावर पिस्तुलातून गोळी झाडण्यात आली होती. गोळी कानाच्या मागील बाजूस लागल्याने ते गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक विनोद पाटील यांनी तपास पथकाला आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या. पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी सुपा टोलनाका परिसरात येणार असल्याची माहिती मिळवली.

## भाजीपाला, फळे अन् कंदमुळांतून साकारली गणरायाची अनोखी आरास

### गुलटेकडी मार्केट यार्डमधील श्री शारदा गजानन मंडळाचा अभिनव देखावा; सामाजिक उपक्रमांची परंपराही कायम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : पुण्यातील गणेशोत्सवाला वैभवशाली परंपरा लाभली असून धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक संदेश देणारे विविध देखावे हे या उत्सवाचे खास आकर्षण ठरत आले आहेत. यंदा गुलटेकडी येथील मार्केट यार्डमधील श्री शारदा गजानन मंडळाने विविध प्रकारची फळे, भाजीपाला, पालेभाज्या आणि कंदमुळे वापरून गणरायाची आकर्षक आरास साकारली आहे.मार्केट यार्ड हे पुण्यातील फळे आणि भाजीपाल्याच्या व्यापाराचे प्रमुख केंद्र. याच परिसराची ओळख अधोरेखित करत मंडळाने यंदाच्या सजावटीत भाजीपाल्याचा कल्पकतेने वापर केला आहे. विविध पालेभाज्या, मुळा, गाजर, मिरची, वांगी, टोमॅटो, काकडी, भोपळा तसेच अन्य फळे आणि कंदमुळांची कलात्म क मांडणी करत गणरायाचा परिसर सजविण्यात आला आहे. त्यामुळे ही आरास भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.

'बळीराजाच्या कष्टातून आपल्या ताटात पोहोचणाऱ्या शेतमालाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचावे आणि शेतकरी, व्यापारी, कामगार व ग्राहक यांच्यातील नाते अधोरेखित व्हावे,' असा संदेश या आरासीतून देण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.श्री शारदा गजानन मंडळाने यापूर्वीही गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली आहे. मंडळाने दूरदृष्टी दाखवत टिळक रस्त्यावरील विसर्जन मिरवणुकीला पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यास पुढाकार घेतला होता. त्यामुळे लक्ष्मी रस्त्यावरील मिरवणुकीचा ताण कमी होण्यास मदत झाली. आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप आणि विविध सामाजिक प्रबोधनपर उपक्रमही मंडळातर्फे राबविण्यात येतात.मार्केट यार्ड परिसरातील व्यापारी, माथाडी कामगार आणि नागरिकांना एकत्र आणत सामाजिक सलोखा आणि एकतेचा संदेश देण्याचे काम मंडळ सातत्याने करत आहे. परंपरा, पर्यावरण, शेती आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम साधणारी यंदाची भाजीपाल्याची आरास पुणेकरांचे लक्ष वेधून घेत आहे.



## द • ख • ल

## प्रभारी गटशिक्षणाधिकारी विनय लाळगे यांची चौकशी करून निलंबनाची मागणी

**पारनेर :** पारनेर पंचायत समिती शिक्षण विभागात विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत असलेले विनय लाळगे यांच्या कार्यपद्धतीबाबत अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली असून त्यांची चौकशी करून निलंबित करण्याची मागणी करण्यात आली आहे. समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले की लाळगे हे शाळा तपासणीच्या नावाखाली शिक्षकांवर दबाव आणतात. तसेच कार्यालयीन वेळेनंतरही रात्री उशिरापर्यंत कार्यालयात थांबण्यामागील कारण काय, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. तसेच त्यांच्याकडे यापूर्वी प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार असताना लोणी हवेली, कान्हूर पठार व पारनेर येथील काही शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षेबाबतच्या घटना घडल्या होत्या, जबाबदार अधिकारी लाळगे यांचे संवेदनशील प्रकरणात दुर्लक्ष झाल्याचे त्यावेळी घडले होते पुन्हा एकदा त्यांच्याकडे प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्यांचा चार्ज वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्याने पुन्हा एकदा शिक्षण विभागाच्या कार्यशालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे याकडेही लक्ष देणे आवश्यक होते, या सर्व पार्श्वभूमीवर त्यांच्या कामकाजाची सखोल चौकशी करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## राशीनमध्ये सुभाष जाधव यांचा सत्कार



**राशीन :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे निष्ठावंत शिवसैनिक मा. सुभाष जाधव, राशीन यांची कर्जत-जामखेड विधानसभा प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल राशीन शहर शिवसेनेच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवसेना राशीन शहरप्रमुख मा. जितेंद्र स्वामी शेटे यांच्या हस्ते सुभाष जाधव यांचा सत्कार करण्यात आला. सुभाष जाधव यांच्यावर पक्षाने विधानसभा प्रमुखपदाची जबाबदारी सोपवल्याने कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. निष्ठावंत शिवसैनिक ते विधानसभा प्रमुख असा जाधव यांचा प्रवास शिवसैनिकांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे. यावेळी अ‍ॅड. विकी साळवे, अमृतजी जंजिरे, संदीप राऊत, औदुंबर देवगावकर, बाबा तांबोळी, सुनील काका दडगळ, दादा राऊत, अमर साळवे, राजेंद्र मुसळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मच्छिंद्र आर्ले यांना 'समाजभूषण' पुरस्कार

**दहिगाव ने :** मजलेशहर ( ता. शेवगाव )येथील रहिवासी, सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र बाजीराव आर्ले यांची सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय



योगदानाची दखल घेत 'समाजभूषण' राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. टाकळीभान ( ता. श्रीरामपूर ) येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ही निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या निवड समितीच्या वतीने आर्ले यांना पाठविण्यात आलेल्या पत्रात ही माहिती देण्यात आली आहे. शेतकरी, सर्व सामान्य नागरिक, धरणग्रस्त शेतकरी आदींसाठी सतत आंदोलन मार्गाने लढा देणारे आर्ले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अहिल्यानगर जिल्हा पदाधिकारी व सक्रिय कार्यकर्ते आहेत. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध क्षेत्रातुन अभिनंदन केले जाते आहे.

## समर्थ अभियांत्रिकी महाविद्यालयात 'अभ्युदय २०२६' अंतर्गत कार्यक्रम



**निघोज :** समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बेल्हे-बांगरवाडी येथे एमबीए, एमसीए व एमइ विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'अभ्युदय २०२६' अंतर्गत इंडक्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता माता सरस्वतीचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमबीए विभागप्रमुख डॉ.महेश भास्कर यांनी केले. इंडक्शन कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांनी नव्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेत ज्ञान, कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्यातून नेतृत्वगुण, संघटनकौशल्य व योग्य नियोजन आत्मसात करण्याचे आवाहन केले. बदलत्या औद्योगिक व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी अद्ययावत ज्ञान, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आत्मसात. यावेळी प्रा. राजीव सावंत, प्रा. प्रदीप गाडेकर, प्रा. शुभम शेळके यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. रुस्तुम दराडे व डॉ. शशिकांत ताजणे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. प्रा.अश्वमेघा सुर्वे यांनी सूत्रसंचालन तर प्रा. प्रमोद गोपाळे यांनी आभार मानले.

## डॉक्टरांचा तालुका अशी पारनेरची नवीन ओळख : डॉ. जरे

**पारनेर :** पारनेरच्या भूमीला बुद्धिमत्तेचे वरदान आहे. पारनेर तालुक्याने नगर जिल्ह्याला आणि महाराष्ट्राला पूर्वी शिक्षक दिले. हाच पारनेर तालुका भविष्यकाळात नगर जिल्ह्याला आणि महाराष्ट्राला डॉक्टर देईल आणि ती सुरुवात गेल्या दोन-तीन वर्षापासून पारनेर पब्लिक स्कूलने केलेली आहे. पारनेर पब्लिक स्कूल आत्तापर्यंत एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस असे शंभरपेक्षा अधिक डॉक्टर दिले. आता तर पंधरा-वीस एमबीबीएसचे डॉक्टर पब्लिक स्कूलमधून बाहेर पडतात, ही तालुक्यासाठी गौरवाची गोष्ट असल्याचे गौरवोद्गार डॉ. महेश जरे यांनी काढले. डॉ. महेश जरे यांच्याहस्ते पारनेर पब्लिक स्कूलच्या भविष्यातील १३ डॉक्टरांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. श्रावणी गोडसे (बीजेएमसी, पुणे), सई पठारे (बीजेएमसी पुणे), तनिष्का काळे (लोकमान्य टिळक एमसी, मुंबई), प्रणव निगुट (जीएमसी, कोल्हापूर), राज फाफळे (जीएमसी, छत्रपती संभाजीनगर), श्रीशांत झंजाड (जीएमसी, मिरज), श्रुती कडूस (केजी सोमय्या एमसी, मुंबई), रिया आंधळे (जीएमसी, अलिबाग), हर्षदा औटी (एसआरटीआर एमसी, अंबेजोगाई), अक्षदा शिंदे (वसंतराव पवार एमसी, नाशिक), आकांक्षा नाईकवाडी (अश्विनी एमसी, सोलापूर), आदित्य दिवटे (जीएमसी, अलिबाग), सागर औटी (एसडीडीसी, परभणी) या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

# 'मान्सून'च्या सप्टेंबरमध्ये 'मे' सारख्या उन्हाच्या झळा!

डॉ अफरोजखान पठाण। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** शहरासह तालुक्यात सध्या उन्हाचा तडाखा चांगलाच बसत असून सर्वसामान्य नागरिकांना दुपारी घराबाहेर पडताना छत्री यासह डोक्यात टोपी, उपरणेचा आधार घ्यावा लागत आहे. विशेष म्हणजे मान्सूनच्या काळातला उन्हाच्या वाढत्या तीव्रतेने सर्वात हॉट सप्टेंबर महिना असल्याचे जेष्ठ नागरिक आणि शेतकरी सांगत आहे. अजून ऑक्टोबर हिटला सामोरे जाण्याची तयारी कर्जतकरांना करावी लागणार असून यंदा फेब्रुवारीपासूनच उन्हाची काहिली सोसावी लागली. सध्या मे महिन्यासारखी हिट कर्जतवासीय सोसत आहे.

यंदा मान्सून पावसाने चांगलीच ओढ दिली. मान्सून हंगामात वरुणराजा आणि पावसाच्या सक्रियेतेची चातकासारखी वाट पाहत असताना सध्या सर्वसामान्य कर्जतकर सप्टेंबर महिन्यात मे महिन्याच्या उन्हाची तीव्र असह्य झळा सोसत आहे. सकाळपासूनच उन्हाचा चटका सुरू होत असून दुपारी त्याची तीव्रता अधिक वाढत असल्याने सर्वसामान्य नागरिक बाहेर पडताना कडक उन्हापासून संरक्षण मिळावे यासाठी डोक्यावर छत्री, डोक्यात उन्हाळी टोपी, उपरणे तर महिला-मुली स्कार्फ बांधून निघत आहे. तसेच मे



महिन्याच्या शेवटी अडगळीत टाकलेला कुलर कर्जतकरांना पुन्हा बाहेर काढून घरातील वातावरण शीतल करीत आहे. अनेक जेष्ठ नागरिक यंदा मान्सून हंगामात मे महिन्यासारखे ऊन चटकत असल्याचे बोलत आहे. एकीकडे मान्सून पावसाने मारलेली दडी तर दुसरीकडे कडक उन्हाच्या तडाख्याने कर्जतकर चांगलेच होरपळून निघत आहेत. या उन्हाच्या तीव्रतेने जमिनीची धूप वाढली असून भू-गर्भातील पाणीपातळी देखील खालवू जाऊ शकते यामुळे परतीच्या पावसाकडे सर्वांचेच डोळे लागले असून तालुक्यातील अनेक ठिकाणी वरुणराजास साकडे घालताना ग्रामस्थ दिसत आहे.

**यावर्षी जवळपास सहा महिने कर्जतकर उन्हाचा चटका सोसत आहे**

यावर्षी फेब्रुवारी महिन्यातच उन्हाची काहिली सुरू झाली होती. मार्च, एप्रिल, मे महिन्यात सूर्याने तब्बल ४२ अंशच्या पुढे पारा पार केला होता. जुनच्या मध्यान्हपर्यंत उन्हाचा चटका जाणवला गेला. तदनंतर ढगाळ हवामान लागले. मात्र आगस्ट महिन्यात पुन्हा सूर्याने आपला प्रकोप सुरु केला असून आजमितीस तो कायम आहे. अजून ऑक्टोबर हिटचा प्रताप कर्जतकरांना सोसावा लागणार आहे.

**माणसाप्रमाणेच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर**

एकीकडे तालुक्यातील १४ गावात ११ पाण्याचे टँकर धावत असून ८९ वाड्या-वस्त्याच्या जवळपास २२ हजार ५८४ नागरिक आपली तहान टँकरच्या पाण्यावर भागवत आहे. तर दुसरीकडे मान्सून पावसाच्या अल्प प्रमाणाने भविष्यात पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न देखील अधिक गडद होणार आहे. त्यामुळे परतीच्या पावसासह वरुणराजाच्या दमदार पुनगामनाकडे लक्ष लागले आहे.

## ढोकेश्वर विद्यालय परिसरातील रोडरोमियोंचा बंदोबस्त करणार : दिवटे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**टाकळी ढोकेश्वर :** विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या रोडरोमियोंचा बंदोबस्त करून परिसरात शिस्त व सुरक्षित वातावरण निर्माण केले जाईल त्यासाठी शाळा भरताना व शाळा सुटल्यानंतर ढोकेश्वर विद्यालयाच्या गेट परिसरात पोलीस नियमित गस्त घालतील असे प्रतिपादन पारनेर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी केले.

श्री ढोकेश्वर विद्यालयात गणेशोत्सवानिमित्त सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की,विद्यार्थिनींनी किशोरवयात शिक्षण घेत असताना कोणताही घाईघाईचा निर्णय घेऊ नये, संयम बाळगावा आणि आपल्या आई-वडिलांचा तसेच कुटुंबाचा विचार करावा.लग्न हे प्रत्येकाच्या आयुष्यात येणारे महत्त्वाचे पर्व आहे त्यामुळे अल्पवयात घरातून पळून जाण्यासारखा निर्णय घेऊ नये. शिक्षण पूर्ण करून योग्य वयात आणि योग्य निर्णयाने जीवनाची वाटचाल करावी असे सांगितले. यावेळी स.पो. नि.सोमनाथ दिवटे,खरेदी विक्री संघाचे मा.अध्यक्ष ॲड.रघुनाथ खिलारी यांच्या हस्ते आरती करण्यात आली.स्वास्थ्य दर्पण प्रतिष्ठान संचालित शांतीनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी धोत्रे बु! यांच्या वतीने दिला जाणारा 'ज्ञानज्योती पुरस्कार ' विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांना मिळाल्याबद्दल त्यांचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी गोपनीय शाखेचे किरण भापकर, प्रा. बाळासाहेब खिलारी, बाळासाहेब निवडुंगे, पत्रकार बाळासाहेब गायकवाड, संतोष कोरडे, गणेश जगदाळे, श्रीनिवास शिंदे, प्रकाश इघे, प्रा.अशोक गांगड, प्रा.नितीन ढोकळे, अतुल सैद, संदीप खिलारी, सोनल रोहकले, श्रीरंग धामणे व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले तर आभार प्रा.भाऊसाहेब हिंगडे यांनी मानले.

## त्रिमूर्ती संकुलात भव्य मॅरेथॉन स्पर्धा' उत्साहात संपन्न



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगे पाटील शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुल, ढोरजळगाव-ने यांच्या वतीने वार्षिक सैनिक प्रशिक्षण २०२६ अंतर्गत रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी 'भव्य मॅरेथॉन स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या मॅरेथॉन स्पर्धेचा शुभारंभ कर्नल के. पी. सिंग , ढोरजळगाव-ने शैक्षणिक संकुलाचे मार्गदर्शक सुखदेव कराड तसेच महाराष्ट्र पोलीस संदीप गिऱ्हे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी संकुलाचे प्रशासक सचिन कर्डिले, सीनियर कॉलेजचे प्राचार्य सुनील चोळके , फार्मसी कॉलेजचे प्राचार्य विनोद भोईटे , उपप्राचार्य सुरज गिऱ्हे ,प्राचार्य आशिष भारती, पब्लिक स्कूलचे प्राचार्य संजय बुधवंत, नवनाथ उकिर्डे, श्रीराम बडे,डॉ.देविदास देशमुख तसेच आजच्या मॅरेथॉन स्पर्धेला ज्यांचं मोलाचं सहकार्य मिळालं ते त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाची टीम मेजर परमेश्वर कसाळ, प्रशांत खताळ, सचिन करोतीया , इम्रान खान,मेजर शेख आसिफ सर, ढोरजळगाव ने संकुलातील प्रशिक्षक आकाश मिसाळ, दीपक कोठे, प्रशांत थोरात, रविंद्र कोकरे तसेच सर्व विभाग प्रमुख सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून वैद्यकीय क्षेत्रात काम करण्याची गरज : गुरुवर्य डॉ. महाराज जाधव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** आई वडीलांची सेवा करीत आपण परमार्थ करतो त्याप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या डॉक्टरांनी रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानीत कार्यरत राहण्याचे आवाहन गुरुवर्य डॉ. नारायण महाराज जाधव यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथील साई समर्थ मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलच्या उद्घाटन कार्यक्रमात ते मार्गदर्शन करताना बोलत होते. या हॉस्पिटलचे उद्घाटन मुंबई येथील व्यवसायीक विष्णू कदम व ठकुबाई कदम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाची सुरुवात उत्तमराव लंके, कलावती आढाव, बाबासाहेब कवाद, नामदेवराव थोरात, लक्ष्मीबाई थोरात, आ. काशिनाथ दाते, गीतांजली शेळके, भास्करराव कवाद यांच्या हस्ते करण्यात आले. गुरुवर्य जाधव महाराज यावेळी म्हणाले डॉ. सुनिल कदम, डॉ. अजित लंके, डॉ. सोमेश्वर आढाव व डॉ. पांडुरंग थोरात यांना ग्रामीण भागाची जाण आहे. खेडूतांच्या सेवेतच खरा पांडुरंग आहे. असे संस्कार त्यांच्या आई वडील यांच्याकडून झाले असल्याने गेली वीस वर्षांच्या वैद्यकीय सेवेत आपण ग्रामीण भागातील जनतेची वैद्यकीय सेवा करुण सेवाभाव आपल्याकडून होऊ शकतो. यावेळी व्यासपीठावर गौरव वांढेकर, विश्वनाथ कोरडे, दिपक लंके, शिवाजीराव जाधव, सुदाम पवार, किसनराव रासकर, वसंतराव चेडे, सुधामती कवाद, अजिंक्य खिलारी, विजय खिलारी आदी तसेच पंचक्रोशीतील मान्यवर, विविध संस्थाचे पदाधिकारी तसेच जुन्नर, आंबेगाव, पारनेर,शिरूर, श्रीगोंदा तालुक्यातील तसेच अहिल्यानगर पुणे, मुंबई येथील नामांकित डॉक्टर उपस्थित होते.

## पोलीस वसाहतीच्या कामासाठी पाठपुरावा

**अमरापुर :** शेवगाव पोलीस वसाहतीचे रखडलेले काम तातडीने मार्गी लागावे, यासाठी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे शेवगाव तालुका प्रमुख विकास शरद शेलार यांनी महाराष्ट्र राज्य शासनाच्या गृह विभागाचे सदस्य राहुल दुबाले यांची भेट घेऊन निवेदन दिले.

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना सुरक्षित व सुविधायुक्त निवास व्यवस्था उपलब्ध होणे आवश्यक असून, वसाहतीचे प्रलंबित काम पूर्ण करण्याची मागणी केली. यावेळी निवेदनाची दखल घेऊन मुख्यमंत्री स्तरावर पोलीस वसाहतीचे काम मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

## डोळ्यात धूळ फेकणाऱ्या अंधश्रद्धेला दूर फेका : गायकवाड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** समाजात आजही अंधश्रद्धेचे विविध प्रकार फोफावत असून अंगात येणे, भूतबाधा, जादूटोणा यांसारख्या घटनांमुळे अनेकांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक नुकसान होत आहे. श्रद्धा ठेवा आणि असावी, मात्र अंधश्रद्धेला खतपाणी घालू नका. कारण समाजातील प्रत्येक घटकाने विज्ञानवादी आणि विवेकशील विचार स्वीकारून अंधविश्वासापासून दूर राहावे, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील राष्ट्रसंत कैकाडी महाराज प्रतिष्ठानच्या वतीने लाडजळगाव फाटा येथे आयोजित अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, आज टीव्ही आणि मोबाईलच्या दुनियेत समाज मोठ्या प्रमाणात गुरफटला आहे. या माध्यमातून विविध प्रकारचे चमत्कार, अंधविश्वास आणि गैरसमज लोकांपर्यंत पोहोचत असतात. त्यामुळे कोणतीही घटना डोळसपणे तपासून तिच्यामागील वैज्ञानिक कारण समजून घेणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने समाजोपयोगी व विज्ञानवादी विचार रुजविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष बुधवंत यांनीही मार्गदर्शन केले. अंगात येणे, भूतबाधा यांसारख्या घटनांकडे अंधश्रद्धेच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यामागील मानसिक, सामाजिक आणि वैद्यकीय कारणांचा विचार केला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. आमचा विरोध देवाला किंवा धर्माला नसून अंधश्रद्धेला आहे, असे सांगत तथाकथित बुवा-बाबांकडून श्रद्धेचा गैरफायदा घेतला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. आर्थिक स्वार्थासाठी लोकांची दिशाभूल करणाऱ्या भोंदू व्यक्तींपासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. संतांनीही विवेक आणि मानवतावादी विचारांना महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला माजी सैनिक दिलीप गायकवाड, विकास गायकवाड, योगेश गायकवाड, दीपक वैद्य, गणेश गायकवाड यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पासाहेब गायकवाड यांनी केले, तर आभार गुरु गायकवाड यांनी मानले.

## पारनेर शहर परिसरातील वाड्यावस्त्यांवर बिबट्याचा मुक्त संचार

### एक पारडी आणि १५ ते २० कोंबड्यांचा फडशा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** शहरालगतच्या सोबलेवाडी,विधाटे वस्ती, वैद्य वस्ती, खोडदे वस्ती, मते मळा, महाजन मळा,कानिफनाथ मळा आणि वरखेड मळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून दोन ते तीन बिबट्यांचा मुक्त संचार असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बिबट्यांच्या वावरामुळे वाड्यावस्त्यांवरील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील दोन-तीन दिवसांपूर्वी शेतकरी शांताराम नामदेव वैद्य यांच्या वैद्य वस्ती येथील घरासमोरील झाडावर असलेल्या कोंबड्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांचा फडशा पाडला. त्याच परिसरात वैद्य यांच्या एका म्हशीच्या पारडीवरही बिबट्याने हल्ला करून ती ठार केली. या घटनेनंतर वैद्य वस्ती परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वैद्य वस्तीवरील सामाजिक कार्यकर्ते सागर वैद्य यांनी या

घटनेची माहिती वन विभागाला दिली होती त्या नंतर वन विभागाने वैद्य वस्ती परिसरात बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावला आहे. मात्र अद्याप बिबट्या पिंजऱ्यात अडकलेला नाही. दरम्यान, काल दि. १९



रोजी रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास कानिफनाथ मळा, लोणी रोडलगत विद्या बापू गाडगे यांच्या घरा शेजारी बिबट्याने धुमाकूळ घातल्याचे सांगण्यात येत आहे. मागील दोन-तीन दिवसांत कोंबड्यांच्या पिंजऱ्यातील सुमारे १० ते १२ कोंबड्या बिबट्याने फस्त केल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.

# भावकीचा वाद असो... की अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा फेरा !

## आ. अक्षय कर्डिलेंचा 'जनता दरबार' नागरिकांसाठी व्यासपीठ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** रस्ते, पाणी, वीज, शासकीय कामे अशा सार्वजनिक प्रश्नांसोबतच घरगुती वाद, भावकीतील तंटे, कौटुंबिक समस्या आणि प्रशासकीय पातळीवरील अडचणी घेऊन नागरिक थेट आमदार अक्षय कर्डिले यांच्या जनता दरबारात पोहोचत आहेत. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याच्या पद्धतीमुळे जनता दरबाराकडे नागरिकांचे लक्ष वेधले गेले आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत नागरिकांच्या समस्या ऐकून घेण्यासाठी जनता दरबाराची पद्धत सुरू ठेवली होती. त्यांच्या निधनानंतर हा उपक्रम पुढे नेण्याचे काम आ. अक्षय कर्डिले करत आहेत.



जनता दरबाराच्या माध्यमातून मतदारसंघातील विकासकामे आणि स्थानिक प्रश्नांसंदर्भात प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरू असल्याचे पाहावयास मिळते.

जनता दरबारात केवळ पायाभूत सुविधांचे प्रश्नच मांडले जात नाहीत. एखाद्या कुटुंबातील वाद, भावकीतील मतभेद, जमिनीशी संबंधित तक्रारी, शासकीय कार्यालयातील प्रलंबित कामे, पाणीपुरवठा, वीज, रस्ते, घरकुल, महसूल अथवा इतर प्रशासकीय अडचणी घेऊन नागरिक येत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

मतदारसंघातील नागरिकांना आपल्या अडचणी मांडण्यासाठी थेट व्यासपीठ उपलब्ध व्हावे हा जनता दरबारामागील उद्देश असल्याचे कर्डिले समर्थक सांगतात. स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या राजकीय वाटचालीतून नागरिकांशी थेट संवाद साधण्याची पद्धत अक्षय कर्डिले यांच्यापर्यंत आली आहे.

जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आमदार कर्डिले यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ. सुजय विखे, आमदार संग्राम जगताप यांचे पाठबळ मिळत आहे. त्यामुळे मतदारसंघाच्या विकासासाठी मोठा निधी आणण्यात आमदार अक्षय कर्डिले यशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे.

**जनता दरबाराकडे वाढते लक्ष !**

नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न थेट लोकप्रतिनिधीसमोर मांडण्याची संधी मिळत असल्याने जनता दरबारात येणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत असल्याचे स्थानिक पातळीवर दिसून येते. प्रश्न लहान असो वा मोठा तो ऐकून घेणे आणि संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करणे या माध्यमातून नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

**वडिलांचा वारसा ; नव्या पिढीची वाटचाल!**

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर भर दिला. त्यांच्या निधनानंतर पुत्र आ.अक्षय कर्डिले यांनी जनता दरबाराची परंपरा पुढे सुरू ठेवली. त्यामुळे कर्डिले कुटुंबाच्या राजकीय वारशासोबतच नागरिकांच्या प्रश्नांशी थेट संवाद साधण्याची पद्धतही पुढे जात असल्याचे चित्र आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.२१ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# अष्टशताब्दी मार्गाने १७ गावांना मिळणार दळणवळणाची जोड

## पुरकाळात ठरणार महत्त्वाचा : रामगिरीजी महाराज




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : गोदावरी नदीच्या तिरावर असलेल्या महानुभाव पंथाच्या आठ मंदिरांना जोडणाऱ्या सर्वज्ञ अष्टशताब्दी मार्गाच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. सुमारे २३४ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे धार्मिक स्थळांसह १७ गावांतील दळणवळणाला चालना मिळणार असून, पुरपरिस्थितीत शेतकरी व नागरिकांना बाहेर पडण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा ठरणार आहे, असे प्रतिपादन सराला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.

सर्वज्ञ अष्टशताब्दी मार्गाच्या विविध विकासकामांचा भूमिपूजन सोहळा रविवार, दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता बाजाठाण येथे सराला बेटाचे मठाधिपती रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या अंतर्गत प्रामा ०२ प्रजिमा २९ किलोमिटर २६/०० ते ७८/०० या १७ गांवाना जोडणार्यारस्त्याचे २३४ कोटी मंजुरीच्या सावखेडगंगा, वांजरगाव, भालगाव, डागपिंपळगाव, चांदेगाव, नागमठाण, अवलगाव, हमरापुर, बाजाठाण, शनिदेव गाव, चेंडूफळ, नेवरगाव, हैबतपुर, अगर कानडगाव, ममदापूर , बगडी, जमगाव ते कायगाव या मार्गाचे काम प्रस्तावित आहे. तसेच बाजाठाण-कमलपूर रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण आणि गोदावरी नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

या सोहळ्यास महंत गुरुवर्य रामगिरीजी महाराज, यांची प्रमुख उपस्थिती कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार रमेश बोरणारे, हरिहर पांडे, माजी आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर,माजी नगाराध्यक्ष साबेरखान, पंचगंगा कासाखरखान्याचे संचालक बाळासाहेब शिंदे, हरिशरणगिरी महाराज, संदिपानजी महाराज, बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज, योंगेद्रगिरी महाराज, शिवसेना जिल्हा प्रमुख बाबासाहेब जताप, रामहरी जाधव, महानुभाव पंथाचे चित्तरदास मुनी महाराज, अनिल बोंद्रे, अंकुश हिंगे, भाऊसाहेब झिंजुर्डे, पारस घाटे, डॉ. प्रकाश शेळके, भावराव भराडे, गणेश तांबे, मंगेश गायकवाड, विजय पवार, पवन चव्हाण, डॉ. बाबासाहेब डांगे, प्रविण पवार, भावराव दुशिंग, संजय मिरगे, रामेश्वर पाटोळे, राजेश्वर हिवाळे, श्रीराम गायकवाड, संतोष गायकवाड, पांडुरंग मेघळे अनिल चव्हाण, सुभाष भराडे, बाळासाहेब गडगुळे, उपविभागिय अधिकारी अरुण जर्हाड, तहसिलदार सुनिल सावंत, बीडीओ जायभाय, ज्ञानेश्वर टेके, उप अभियंता रोडगे, विविध संत-महंत, लोकप्रतिनिधी व मान्यवरांचीही उपस्थिती होती.

## श्रीगोंदा पोलीस ठाण्यात झाले भांडण अन् बचावासाठी जबाबात 'चेष्टा-मस्करी'!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दोन पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये वाद झाल्याची चर्चा गेल्या ४८ तासांपासून सुरू असतानाच, संबंधित दोन्ही कर्मचाऱ्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर 'चेष्टा-मस्करीदरम्यान आवाज वाढल्याने गैरसमज झाला' असा लेखी जबाब दिल्याने प्रकरणाला नाट्यमय वळण मिळाले आहे. गुरुवारी (दि.१८) ड्युटी संपवून घरी जाणारे संभाजी गर्जे आणि गेटवर उभे पण कर्तव्यावर असलेले संदीप राऊत यांच्यात पोलीस ठाण्याच्या परिसरात वाद झाल्याची चर्चा होती. काही प्रत्यक्षदर्शींनी मारामारी व शिवीगाळ झाल्याचे सांगितल्याने ही चर्चा सोशल मीडियावरही पसरली. त्यानंतर वृत्तपत्रातून या बातम्या प्रसिद्ध झाल्या आणि ते दोन हुशार पोलीस कर्मचारी सावध भूमिकेत आले आता याबाबत जर एकमेकांविरोधी तक्रारी केल्या तर दोघांवरही कारवाई होणार त्यामुळे आपल्याला जर इथे राहायचे असेल तर सावध भूमिका घेऊन भांडण झालीच नव्हती असे दोन्ही कर्मचाऱ्यांनी लेखी जबाबात दिले आहेत त्यामध्ये त्यांनी मारामारी किंवा परस्पर तक्रारीचे खंडन करत प्रकार केवळ चेष्टा-मस्करीतून आवाज वाढल्याचे नमूद केले आहे.मात्र जर भांडण झाले नव्हते तर आवाज कश्यासाठी वाढला होता तसेच प्रत्यक्षदर्शी यांनी नेमक्या कोणाच्या हाणामारी होताना पहिली हे मात्र अजूनही गुलदस्त्यातच आहे दरम्यान, प्रकरण अहिल्यानगर पोलीस अधीक्षकांच्या स्तरावर पोहोचल्याची माहिती आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चौकशीत या प्रकरणाचे नेमके सत्य काय समोर येते, याकडे लक्ष लागले आहे. हाणामारीची चर्चा, वृत्तपत्रांतील बातम्या आणि त्यानंतर 'चेष्टा-मस्करी'चा लेखी जबाब या परस्परविरोधी चित्रामुळे श्रीगोंदा पोलीस ठाण्यात नेमके काय घडले, हा प्रश्न मात्र आजही कायम आहे.

### चर्चेला छेद देणारे जबाब सत्य सीसीटीव्हीत?

घटनेबाबत बाहेर सुरू असलेली चर्चा आणि कर्मचाऱ्यांनी दिलेले लेखी जबाब यामध्ये स्पष्ट तफावत असल्याने आता सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी होत आहे. पोलीस ठाणे परिसरातील कॅमेऱ्यांचे फुटेज, प्रत्यक्षदर्शींचे जबाब आणि उपलब्ध इतर पुरावे तपासल्यास नेमके वास्तव स्पष्ट होऊ शकते.

## दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एक ठार, एक गंभीर



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : बाबळेश्वर-श्रीरामपूर मार्गावरील ममदापूर बसस्थानक परिसरात दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. जखमीची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोपट ज्ञानदेव बर्डे (वय ३८, रा. मालुंजे, ता. संगमनेर) हे एमएच १७ डी.क्यू. ०२५९ क्रमांकाच्या दुचाकीवरून बाबळेश्वरकडून श्रीरामपूरच्या दिशेने जात होते. याचवेळी एमएच १७ डी.जी. ३३१३ क्रमांकाच्या दुचाकीवरून दोघे जण श्रीरामपूरहून बाबळेश्वरच्या दिशेने जात होते. ममदापूर बसस्थानक परिसरात दोन्ही दुचाकी समोरासमोर आल्यानंतर त्यांच्यात जोरदार धडक झाली. धडकेनंतर दोन्ही दुचाकीस्वार रस्त्यावर कोसळले. या अपघातात पोपट बर्डे यांचा जागीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या दुचाकीवरील जखमीला तातडीने प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच लोणी पोलिस ठाण्याचे कर्मचारी तसेच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. जखमीला पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, लोणी पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरम्यान, याच ठिकाणी साधारण वर्षभरापूर्वी दुचाकीस्वाराच्या डोक्यावरून ट्रकचे चाक गेल्याने त्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे ममदापूर बसस्थानक परिसरातील अपघातप्रवण ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

## सुरेगाव येथील साडेतीन शक्तीपीठ मंदिरातील दानपेटी चोरी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील सुरेगाव (गंगा) येथील प्रसिद्ध साडेतीन शक्तीपीठ मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी लांबवल्याची घटना शनिवार दि. १९ रोजी झाली. याबाबत सुनील देवकीसन शिंदे धंदा.शेती, रा.सुरेगाव (गंगा) ता.नेवासा नेवासा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादित म्हंटले आहे की आमच्या गावात साडेतीन शक्ती पीठ जगदंबा देवीचे मंदीर आहे. दि.१९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेचे सुमारास मी आमचे गावात साडीतन शक्ती पीठ जगदंबा देवीचे मंदीरात साफ सफाई साठी गेलो असता मला मंदीरामधे दान पेटी दिसली नाही. त्यामुळे मी गावातील किशोर मच्छिंद्र शिंदे, रामेश्वर दुर्लभ हापसे व इतर लोकांना बालावुन घेवुन आम्ही सदर दान पेटीचा मंदीरामध्ये तसेच मंदीराच्या आजुबाजुला शोध घेतला असता ती मिळून आली नाही. आमची खात्री आली की आमचे देवीचे मंदीरातील दान पेटीतील अंदाजे पाच हजार रुपये रक्कम कोणी तरी अज्ञात चोरट्याने स्वत:चे आर्थीक फायद्या करीता चोरुन नेली आहे. या फिर्यादीवरून नेवासा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२).नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटना स्थळाचा पंचनामा केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार पवार करीत आहेत. चोरांचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## भिंगानमध्ये शेतजमिनीच्या वादातून सशस्त्र हाणामारी

### १५ जणांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : भिंगान येथे शेतजमिनीच्या वादातून दोन गटांत सशस्त्र हाणामारी झाल्याची घटना १७ सप्टेंबर रोजी घडली. या प्रकरणी दोन्ही बाजूंनी दाखल केलेल्या तक्रारीवरून एकूण १५ जणांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तलवार, लोखंडी गज, लाकडी काठ्या आणि फर्शीने मारहाण केल्याचे आरोप तक्रारीत करण्यात आले आहेत. आदेश आप्पासाहेब शेंडगे यांच्या तक्रारीवरून दाखल गुन्ह्यानुसार, शेंडगे हे काही जणांसह महादेव मंदिराच्या सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी करण्यासाठी गेले असता नऊ जण तेथे आले.

शिवीगाळ व दमदाटी करून तलवार आणि लोखंडी गजाने मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेत आदेश शेंडगे, रोहन शेंडगे व सिद्धांत शेंडगे जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात गेल्यानंतरही तक्रार केल्यास जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. दुसऱ्या बाजूने संदीप बापू तोंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आदेश शेंडगे यांच्यासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींनी घरासमोर जमाव करून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लोखंडी गज, लाकडी काठी व फर्शीने मारहाण करून जखमी केल्याचा तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तोंडे यांनी केला आहे.

या घटनेत संदीप तोंडे व संतोष लोखंडे जखमी झाल्याचे पोलिस नोंदीत नमूद आहे. दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हे दाखल असून, अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक पवण मोहिते आणि महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल जमुना बजंगे करीत आहेत.

## समृद्धी महामार्गावर गोवंश तस्करीचा पर्दाफाश

### पाच पिकअप वाहने पकडली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावरून गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी रविवारी सकाळी कारवाई करत पाच पिकअप वाहने पकडली. या कारवाईत गोवंश आणि वाहनांसह एकूण १९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांना समृद्धी महामार्गावरून काही वाहनांमध्ये गोवंश कोंबून त्यांची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती.

त्यानुसार पोलिसांनी नागपूर मार्गिकेवरील वाहिनी क्रमांक ४८८ जवळ नाकाबंदी केली. सकाळी साडेनऊच्या सुमारास संशयित पाच वाहने अडवून तपासणी केली असता त्यामध्ये गोवंश कोंबून वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. गोवंशाला अत्यंत दाटीवाटीने बांधण्यात आले होते. चारा-पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांची दयनीय स्थिती झाली होती. पोलिसांनी महिंद्रा बोलेरो पिकअप तसेच टाटा कंपनीच्या वाहनांसह गोवंश असा एकूण १९ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. या प्रकरणी अमोल प्रल्हाद गिरे (रा. डोईफोळवाडी, ता. गंगापूर), लक्ष्मण कल्याण चौरमले (रा. मांजर्सुभा, ता. बीड), विशाल विश्वास कदम (रा. गवारी, ता. बीड), सचिन भाऊसाहेब मोकले (रा. आडगाव सरक, ता. छत्रपती संभाजीनगर) आणि अभिषेक बापुराव रकटे (रा. आहेर चिंचोली, ता. बीड) यांच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खानापूरचे सरपंच ज्ञानदेव आदिक यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर ग्रामपंचायतीचे सरपंच ज्ञानदेव आदिक, खानापूर विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन नामदेव आदिक यांच्यासह दादासाहेब चौधरी, बाबासाहेब जगताप, आप्पासाहेब चौधरी, मच्छिंद्र ढमक यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या पक्षप्रवेशामुळे खानापूर परिसरात भाजपच्या संघटनात्मक विस्ताराला नवे बळ मिळाले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीधर आसने व तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, जिल्हा उपाध्यक्ष दीपकराव पटारे, तालुका उपाध्यक्ष डॉ. शंकरराव मुठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सरपंच ज्ञानदेव आदिक यांनी, खानापूर परिसरातील विकासकामांना अधिक गती मिळावी, नागरिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे न्याय मिळावा आणि परिसराच्या विकासासाठी शासनाच्या माध्यमातून अधिक व्यापक काम करता यावे, या उद्देशाने भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली परिसराच्या विकासासाठी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. पक्षप्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वागत करून त्यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

नवीन कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे पक्षाची संघटनात्मक ताकद वाढणार असून, सर्वांना सोबत घेऊन विकासाच्या माध्यमातून जनतेची सेवा करण्यास प्राधान्य दिले जाईल, असे यावेळी सांगण्यात आले. खानापूर परिसरातील विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे भाजपमध्ये प्रवेश केल्याने परिसरातील पक्ष संघटनेला अधिक बळ मिळाले आहे. यावेळी माळवाडगाव ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब आसने, भाजप सोशल मीडिया सेलचे तालुका संयोजक संदीप आसने, दिलीपराव हुरूळे, अप्पासाहेब मुठे, संदिप डाखे, मच्छिंद्र शिंदे, रवींद्र शिंदे, रमेश आसने, पद्माकर आसने, बाळासाहेब आसने, सारंगधर आसने, सुदाम आसने, सचिन आसने, अंकुश आसने, योगेश आसने, विष्णूभाऊ शिंदे, दादासाहेब मोरे, नानासाहेब बोर्डे, अनिल आसने, संजय आसने, सुभाष आसने, राजेंद्र आसने, शंकरराव आसने आदी उपस्थित होते.

## संगमनेरची समृद्ध अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागेल

### बाळासाहेब थोरात; अमृतवाहिनी बँकेची ४४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील सहकारी संस्था मोठ्या कष्टातून उभ्या राहिल्या असून, त्यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. तालुक्यातील बँका व पतसंस्थांमध्ये सुमारे ९ हजार कोटी रुपयांच्या ठेवी असून ही तालुक्याच्या आर्थिक समृद्धीची निशाणी आहे. ही व्यवस्था मोडण्यासाठी काही जण प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे तालुक्याची समृद्ध अर्थव्यवस्था टिकविण्यासाठी सर्वांना संघर्ष करावा लागेल. तसेच चुकीची माहिती पसरविणाऱ्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे, असे प्रतिपादन माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकारमहर्षी अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या ४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी होते. यावेळी पद्मश्री रघुवीर खेडकर, ड. माधवराव कानवडे, दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, बाबा ओहोळ, इंद्रजीत थोरात यांच्यासह संचालक, पदाधिकारी, सभासद व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमृतवाहिनी बँकेने १२०० कोटी रुपयांचा व्यवसाय केला असून शेतकऱ्यांच्या विश्वासाची हक्काची बँक म्हणून नावलौकिक मिळविला आहे, असे थोरात म्हणाले.

सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असून पिके जळत आहेत. पिकांना पाण्याची गरज असताना वीजपुरवठ्याचा खेळखंडोबा सुरू आहे. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. हक्काचे पाणी पुढे गेले तर पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. चेअरमन सुधाकर जोशी यांनी बँकेचा व्यवसाय १२०० कोटींवर पोहोचला असून एनपीए शून्य टक्के असल्याचे सांगितले. बँकेने आधुनिक डिजिटल व नेट बँकिंग सुविधा सुरू केल्या आहेत. सोशल मीडियातून गैरसमज पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल रघुवीर खेडकर यांचा बँकेच्या वतीने मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

उत्कृष्ट ग्राहकांचाही सन्मान करण्यात आला. सभासदांना नऊ टक्के लाभांशाची रक्कम एसएमएसद्वारे पाठविण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील जोशी यांनी नोटीस वाचन केले. सुधाकर जोशी यांनी प्रास्ताविक केले, तर उपाध्यक्ष ड. नानासाहेब शिंदे यांनी आभार मानले.




CMYK